दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष –५ | अंक–०४ | बुधवार, दि.२३ एप्रिल २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

### संपादकीय

## जिवा भावाच्या सोन्याला उफाडी!

अमेरिका आणि चीनमधील वाढत्या व्यापारी तणावादरम्यान सोन्याच्या किमतींनी खूपच भाव खात नवा उच्चांक गाठला आहे. १५ एप्रिलला प्रती १० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याची किंमत ९५,५०० रुपये होती. जीएसटीसह किमती ९६ हजारने ९७ हजार रुपयांवर पोहोचल्या होत्या. एप्रिलअखेर सोन्याच्या किमती अक्षय्य तृतीयेच्या निमित्ताने प्रती १० ग्रॅम १ लाख रुपयांपर्यंत पोहोचू शकतील, असा विश्लेषकांचा अंदाज होता; परंतु दि. २१ एप्रिल रोजीच दुपारी १२ वाजता सोन्याने १ लाखाचा टप्पा गाठला. किमतीतील वाढ बाजारातील अस्थिरतेमुळे झाली आहे. किमतवाढीचा फायदा गुंतवणूकदारांना झाला असला तरी ग्राहकांना त्याचा फटका बसला आहे

## यूपीएससी परीक्षेत शक्ती दुबे देशात पहिली, पुण्याचा अर्चित डोंगरे तिसरा

नवी दिल्लीः केंद्रीय लोकसेवा आयोगाने नागरी सेवा परीक्षा २०२४ चा अंतिम निकाल मंगळवारी (दि.२२) जाहीर केला. प्रयागराज येथील शक्ती दुबे हिने यूपीएससी सीएसई २०२४ मध्ये देशात अव्वल स्थान पटकावले आहे. हरियाणाच्या हर्षिता गोयल हिने दुसरा क्रमांक मिळवला आहे. तर पुण्याचा अर्चित पराग डोंगरे याने तिसरा क्रमांक मिळवला.

ही परीक्षा दिलेले आणि प्रिलिम्स, मेन्स, मुलाखत हे सर्व टप्पे उत्तीर्ण झालेले उमेदवार अधिकृत वेबसाइटवर त्यांचा निकाल पाहू शकतात. भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय परराष्ट्र सेवा, भारतीय पोलिस सेवा आणि विविध गट ए आणि गट बी केंद्रीय सेवांमधील नियुक्त्यांसाठी एकूण १,००९ उमेदवारांची निवड करण्यात आली आहे.


# मत्स्यव्यवसायाला शेतीचा दर्जा!

## मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय, राज्यातील ४ लाख ८३ हजार मच्छीमारांना होणार फायदा

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील मत्स्यव्यवसायाला शेतीचा दर्जा देण्याचा निर्णय राज्य सरकारने मंत्रिमंडळ बैठकीत घेतला आहे. सागरी मत्स्यव्यवसायात ६ वा क्रमांक महाराष्ट्राचा लागतो. त्यामुळे शेतीचा दर्जा देण्याची मागणी केली जात होती. त्यानुसार राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि.२२) मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीला राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते.**

राज्यात कोकण किनारपट्टी भागात मत्स्यव्यवसाय मोठ्या प्रमाणावर केला जातो. त्यामुळे मत्स्यव्यवसायला शेतीचा दर्जा देण्यात येणार आहे. तसेच शेतीप्रमाणेच मत्स्य व्यावसायिकांना नुकसान भरपाई देखील मिळणार आहे. तसेच विविध योजनेचा लाभ मत्स्य शेती करणाऱ्यांना घेता येणार आहेत, असा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. मत्स्यव्यवसायाला कृषी व्यवसायाचा दर्जा देण्याबाबत अंतिम मान्यतेसाठी वित्त विभागाकडे प्रस्ताव



पाठवण्यात आला होता. त्यानुसार आज मंत्रिमंडळ बैठकीत हा मुद्दा चर्चेत आला. त्यामध्ये मत्स्यव्यवसायाला शेतीचा दर्जा देण्यात आला आहे. परिणामी राज्य आणि केंद्र सरकारकडून देण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ मत्स्यव्यवसायिकांना मिळणार आहे. याबाबत बोलताना नितेश राणे म्हणाले की, देशाला परकीय चलन तसेच प्रथिनयुक्त अन्न पुरविण्यात मत्स्य व्यवसायाचे मोठे योगदान आहे. राज्य कृषीप्रमाणे मत्स्यव्यवसाय क्षेत्रात चांगले उत्पादन व उत्पन्न घेण्यास सक्षम आहे.

आजच्या निर्णयामुळे राज्यातील ४ लाख ८३ हजार मच्छीमारांना याचा फायदा होणार आहे. मत्स्यव्यवसायास कृषीचा दर्जा नसल्याने मच्छीमार, मत्स्यसंवर्धक व मत्स्य कास्तकारांना अनेक पायाभूत सुविधा व सवलतीपासून वंचित राहावे लागत होते. राज्यात आता मत्स्य शेतीला कृषीचा दर्जा देऊन मच्छीमार, मत्स्यसंवर्धक व मत्स्य कास्तकारांना अनेक पायाभूत सुविधा व सवलती उपलब्ध करून दिल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थाचे ◀◀ पान २ वर

## औरंगाबाद, नागपूर खंडपीठाला धमकीचा ई-मेल; सुरक्षा यंत्रणा सतर्क!



**नागपूर । प्रतिनिधी**

**मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या ऑफिशियल ई–मेल आयडीवर मद्रास टायगर या नावाने बॉम्बस्फोटाच्या धमकीचा ई–मेल आल्याने एकच खळबळ उडाली. धमकीचा मेल मिळाल्यानंतर तत्काळ सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या.**

बॉम्बशोधक व नाशक पथक (बीडीएस), तसेच श्वान पथक आणि पोलीस दलाने खंडपीठाच्या इमारतीत व संपूर्ण परिसरात सखोल तपासणी करण्यात आली, मात्र संशयास्पद कोणतीही वस्तू आढळून आली नाही, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. मद्रास टायगर या नावाने इतर ◀◀ पान २ वर

# पर्यटकांवर मोठा दहशतवादी हल्ला, २७ जणांचा मृत्यू

## अमित शहा श्रीनगरला रवाना, मृतात दोन महाराष्ट्रीयन

**श्रीनगर । वृत्तसंस्था**

**जम्मू काश्मीरमधील पहलगाम इथं पर्यटकांवर मोठा दहशतवादी हल्ला झाला आहे. या हल्ल्यात २७ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. या घटनेनंतर देशाचे गृहमंत्री अमित शहा हे श्रीनगरला रवाना झाले असल्याचे सांगण्यात येत आहे. हल्ल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सौदी अरेबियातून गृहमंत्री अमित शहांशी फोनवर चर्चा केली. दहशतवादी हल्ल्यानंतर अधिकाऱ्यांसोबत बैठकही घेतली. अमित शहा यांनी घटनास्थळी जाण्याचे निर्देश मोदींनी दिले. दरम्यान, मृतांमध्ये महाराष्ट्रातील दोघांचा समावेश आहे.**

अमरनाथ यात्रेला लवकरच सुरुवात होणार आहे. त्या आधी झालेल्या या हल्ल्यामुळे चिंता व्यक्त केली जात आहे. पर्यटकांना टार्गेट करण्यात आले असून ऐन पर्यटनाच्या हंगामात झालेल्या या घनटेमुळं खळबळ उडाली आहे. पहलगाममधील अशा भागात हा हल्ला झाला आहे जिथे केवळ पायी किंवा घोड्यांवरून ◀◀ पान २ वर

### महाराष्ट्रातील दोघांचा मृत्यू, दोन जखमी – फडणवीस

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काश्मीरचे विभागीय आयुक्त विजयकुमार बिदरी यांना फोन करुन या हल्ल्याची माहिती घेतली. आतापर्यंत प्राप्त माहितीनुसार, महाराष्ट्रातील दिलीप डिसले आणि अतुल मोने या दोघांचा मृत्यू झाला. तर इतर दोघे जमखी आहेत. जखमींमध्ये माणिक पटेल हे पनवेलचे आहेत. तर एस भालचंद्र राव हे राज्यातील कोणत्या भागातील आहेत याची माहिती घेतली जात आहे. जी काही मदत लागेल ती मदत प्रशासन करत आहे. अशा प्रकारच्या हल्ल्याचा आम्ही निषेध करत असून त्यांचा नायनाट केल्याशिवाय आम्ही थांबणार नाही असं राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

### धर्म विचारून गोळ्या झाडल्या, टीआरएफने स्वीकारली जबाबदारी

जम्मू–काश्मीरच्या पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या पर्यटकांवरील हल्ल्यामध्ये २७ हून अधिक पर्यटकांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. या आकड्यामध्ये वाढ होऊ शकते. तसेच अनेकजण जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या दहशतवादी हल्ल्याची जबाबदारी टीआरएफ या दहशतवादी संघटनेनं स्वीकारली आहे. हल्लेखोर पोलिसांच्या गणवेशात आले होते. तसेच त्यांनी धर्म विचारून गोळ्या झाडल्या अशी प्रत्यक्षदर्शींची माहिती आहे.




## वक्फ कायद्यामुळे गरीब, गरजू मुस्लिमांना न्याय मिळेल- रिजिजू

मुंबईः वक्फ (सुधारणा) कायदा २०२५ चा मूळ उद्देशच पूर्वीच्या कायद्यातील त्रुटी दूर करून वक्फ बोर्डाची कार्यक्षमता वाढवणे हा आहे. 'वक्फ मालमत्तां'च्या नियमन आणि व्यवस्थापनातील समस्या आणि आव्हाने दूर करण्यासाठी हा कायदा करण्यात आला आहे. या कायद्यामुळे कोणाच्याही अधिकारांचे हनन होणार नाही. सर्व गरीब गरजू मुस्लिमांना न्याय मिळेल, अशी ग्वाही केंद्रीय अल्पसंख्याक, संसदीय कार्य मंत्री किरण रिजिजू यांनी दिली. मुंबईमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेत ◀◀ पान २ वर

## रमेशराव आडसकर अखेर अजित पवारांच्या राष्ट्रवादीत दाखल

**मुंबई । प्रतिनिधी**

**नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीनंतर भारतीय जनता पार्टीमध्ये अस्वस्थ असलेले जिल्ह्याचे जेष्ठ नेते रमेशराव आडसकर यांनी अखेर अजित दादा पवार यांचे नेतृत्व मान्य करत राष्ट्रवादीमध्ये मंगळवारी अधिकृत प्रवेश केला.**

मागच्या कांही दिवसांपासून रमेश आडसकर यांची अजित पवार यांच्याशी वाढलेली जवळीकता चर्चेचा विषय ठरत होती. अखेर मुंबई येथे मंगळवारी पार पडलेल्या कार्यक्रमांमध्ये रमेश आडककर यांनी जाहीर प्रवेश केला. यावेळी राष्ट्रवादीचे बडे नेते प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, नवाब मलिक यांच्यासह अन्य नेत्यांची उपस्थिती होती. ◀◀ पान २ वर




## अविनाश पाठक यांची बदली विवेक जॉन्सन नवे जिल्हाधिकारी

बीड । प्रतिनिधी

बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची बदली करण्यात आली आहे. आता बीडचे जिल्हाधिकारी म्हणून विवेक जॉन्सन यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

अविनाश पाठक यांची मत्स्यव्यवसाय विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकपदी बदली करण्यात आली आहे. पवनचक्की प्रकरणात शेतकऱ्यांपेक्षा कंपनीची ◀◀ पान २ वर



अविनाश पाठक



विवेक जॉन्सन

## माजलगावचे ढाबाचालक महादेव गायकवाड खून प्रकरणातील तीन आरोपी पोलिसांच्या ताब्यात!



**माजलगाव । प्रतिनिधी**

**येथील गावरान ढाब्याचे मालक महादेव गायकवाड यांचा दि २० एप्रिल रोजी किरकोळ कारणावरून ग्राहकाशी वाद झाला होता.या वादाचे रूपांतर हाणामारीत झाल्यानंतर महादेव गायकवाड यांना गंभीर दुखापत झाली होती.यात महादेव गायकवाड यांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला. यातील प्रमुख आरोपी असलेले रोहित शिवाजीराव थावरे, ऋषिकेश रमेशराव थावरे,कृष्णा माणिकराव थावरे (सर्व रा. आनंदगाव) यांना दि २२ एप्रिल मंगळवार रोजी पहाटे आळंदी (पुणे) येथून ताब्यात घेण्यात आले. ही कारवाई बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या कर्मचाऱ्यांनी केली.**

माजलगाव येथील परभणी रोडवर महादेव गायकवाड यांचे गावरान धाबा नावाचे हॉटेल आहे. या हॉटेलवर रोहित शिवाजीराव थावरे आणि त्याचे इतर दोन मित्र असलेले आरोपी ऋषिकेश रमेशराव थावरे आणि ◀◀ पान २ वर

## पंकजा मुंडेंचा प्रदेश कार्यालयात हाऊसफुल्ल जनता दरबार

### राज्यभरातून नागरिकांची तोबा गर्दी ; प्रत्येकांची गाऱ्हाणी ऐकली ; जनतेच्या समस्यांचे जागेवरच निराकरण

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचा भाजपच्या प्रदेश कार्यालयात आज आयोजित करण्यात आलेला जनता दरबार अक्षरशः हाऊसफुल्ल झाला. राज्यभरातून आपापल्या समस्या घेऊन आलेल्या लोकांनी यावेळी तोबा गर्दी केली होती. प्रत्येक नागरिकांना भेटून त्यांच्या समस्या जाणून घेत त्यांच्याशी संवाद साधत ना. पंकजाताईंनी त्यांच्या प्रश्नांचा जागेवरच निपटारा केला.**

भाजपच्या वतीने प्रत्येक महिन्याला ◀◀ पान २ वर




### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२२ एप्रिल २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३५.५० क्विंटल | २,१०० | २,८९५ | २,६३७ |
| ज्वारी/हायब्रिड : १०६.५० क्विंटल | १,९०० | ३,३४१ | २,४७७ |
| मका/लोकल:५०.०० क्विंटल | २,००० | २,००० | २,००० |
| तूर : १८.०० क्विंटल | ६,५२५ | ६,८०० | ६,६९० |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ५२.५० क्विंटल | २,१६८ | २,७९१ | २,५३६ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: १०२.५० क्विंटल | ४,४०१ | ४,४४१ | ४,४२२ |
| हरभरा: २६.०० क्विंटल | ५,४०० | ५,५०० | ५,४३८ |

# सोन्याने गाठला नवा उच्चांक!

## १० ग्रॅमचा भाव १,०१,६०० रुपये, आतापर्यंतचा सर्वकालीन उच्चांक

**मुंबई । प्रतिनिधी**

**मंगळवारी सोन्याच्या किमतीत प्रचंड उसळी दिसून आली. दिल्लीच्या सराफा बाजारात १० ग्रॅम सोन्याचा भाव १,८०० रुपयांनी वाढून १,०१,६०० रुपये प्रति १० ग्रॅमवर पोहोचला, जो आतापर्यंतचा सर्वकालीन उच्चांक आहे. अक्षय तृतीया आणि लग्नसराईच्या हंगामापूर्वी खरेदीदारांची वाढती गर्दी आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील आर्थिक अनिश्चिततेमुळे सोन्याला सुरक्षित गुंतवणूक मानले जात आहे, त्यामुळे किमतीत सातत्याने वाढ होत आहे.**



ऑल इंडिया सराफा असोसिएशननुसार, दिल्लीत ९९.९% शुद्धतेचे सोने सोमवारी ९९,८०० रुपये प्रति १० ग्रॅम होते, ते मंगळवारी १,८०० रुपयांनी वाढून १,०१,६०० रुपये प्रति १० ग्रॅमवर पोहोचले. तर ९९.५% शुद्धतेचे सोने २,८०० रुपयांच्या तीव्र उसळीसह १,०२,१०० रुपये प्रति १० ग्रॅमवर गेले, जे सोमवारी ९९,३०० रुपये होते. ३० एप्रिल रोजी ◀◀ पान २ वर

### डिसेंबरपासून २२,६५० रुपयांची वाढ

गेल्या काही महिन्यांत सोन्याच्या किमतीत प्रचंड वाढ झाली आहे. डिसेंबर २०२४ पासून आतापर्यंत सोने प्रति १० ग्रॅम २२,६५० रुपयांनी महागले आहे, म्हणजेच सुमारे २९% ची उसळी दिसून आली. दुसरीकडे, चांदीच्या किमती मंगळवारी स्थिर राहिल्या आणि त्या ९८,५०० रुपये प्रति किलोग्रॅमवर कायम राहिल्या.

### गुंतवणूकदारांसाठी संकेत

सोन्याची सध्याची तेजी सुरक्षित आणि दीर्घकालीन गुंतवणूक शोधणाऱ्यांसाठी संधी ठरू शकते. तथापि, गुंतवणुकीपूर्वी बाजारातील चढ–उतारांचा विचार करून सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे, विशेषतः जेव्हा किमती उच्चांकावर असतात आणि अस्थिरता कायम आहे. जर सध्याचा कल सुरू राहिला, तर अक्षय तृतीयापर्यंत सोन्याच्या किमतीत आणखी वाढ होऊ शकते. खरेदीदार आणि गुंतवणूकदारांनी येत्या काही दिवसांत बाजारातील हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवावे.

## अग्रलेख

# जिवा भावाच्या सोन्याला उफाडी !

अमेरिका आणि चीनमधील वाढत्या व्यापारी तणावादरम्यान सोन्याच्या किमतींनी खूपच भाव खात नवा उच्चांक गाठला आहे. १५ एप्रिलला प्रती १० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याची किंमत ९५,५०० रुपये होती. जीएसटीसह किमती ९६ हजारने ९७ हजार रुपयांवर पोहोचल्या होत्या. एप्रिलअखेर सोन्याच्या किमती अक्षय्य तृतीयेच्या निमित्ताने प्रती १० ग्रॅम १ लाख रुपयांपर्यंत पोहोचू शकतील, असा विश्लेषकांचा अंदाज होता; परंतु दि. २१ एप्रिल रोजीच दुपारी १२ वाजता सोन्याने १ लाखाचा टप्पा गाठला. किमतीतील वाढ बाजारातील अस्थिरतेमुळे झाली आहे. किमतवाढीचा फायदा गुंतवणूकदारांना झाला असला तरी ग्राहकांना त्याचा फटका बसला आहे त्यामुळे ज्वेलर्सच्या विक्रीवर परिणाम झाला आहे. चांदीचा भावही प्रती किलो ग्रॅम ९९,८०० रुपये आहे. सध्या सुरू असलेला व्यापार तणाव आणि बाजारातील अनिश्चिततेमुळे सोन्याचे भाव आणखी वाढण्याची शक्यता आहे. काही दिवसांपूर्वी सोन्याच्या दरात थोडीशी घसरण झाली होती मात्र आता ही घसरण थांबली आहे. डॉलर कमकुवत झाल्यामुळे आणि जगातील दोन मोठ्या अर्थव्यवस्थांमधील वाढत्या व्यापार युद्धामुळे सोन्याच्या किमती थोड्याशा घसरल्या होत्या. सोन्याचे भाव कडाडल्यामुळे सोन्याची झळाळी वाढली असतानाच सर्वसामान्य नागरिक, गुंतवणूकदारांना अनेक प्रश्न पडत आहेत, त्यांच्या मनात अनेक शंका आहेत.

डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष पदाचा भार स्वीकारल्यापासून निर्णय घेण्याचा धडाका लावला आहे. यात एक महत्त्वाचा निर्णय म्हणजे इतर देशातून येणाऱ्या मालावर आयात शुल्क आकारणे. या निर्णयाचा जगभरात परिणाम झाला. भारतीय शेअर बाजारात जोरदार घसरण झाली तर दुसऱ्या बाजूला सोन्याचे भाव वाढले. सोन्यामधील गुंतवणूक सुरक्षित मानली जाते. सोन्याच्या दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिक, गुंतवणूकदार आणि उद्योगात चिंतेचे वातावरण निर्माण झाले. लंडन बुलियन मार्केटमध्ये सोन्याचे भाव किंवा किंमत निश्चित होते. बडे खाण उद्योजक आणि मोठे उद्योजक या व्यवस्थेचा भाग आहेत. या बाजारात सोन्याच्या भावात सातत्याने वाढ होत आहे. या मागे विविध कारणे आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर असलेली राजकीय परिस्थिती, आयात शुल्क आणि जगभरात विविध ठिकाणी असलेली युद्धजन्य परिस्थिती यामुळे सोन्याच्या भावात वाढ होताना दिसते आहे. भारतीय शेअरबाजार गडगडल्यानंतर अनेक जण सोन्यामध्ये गुंतवणूक करताना दिसत आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर निर्माण झालेल्या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर सोन्यामध्ये गुंतवणूक करणे हा योग्य पर्याय मानला जात आहे. सोन्याच्या दरवाढीमागे अमेरिका आणि चीनमधील व्यापारयुद्ध हे प्रमुख कारण आहे. यामुळे सर्व कच्च्या मालाच्या किमतीत वाढ होत आहे. या पुढे सोन्याचे भाव वाढतच राहतील. सोन्याच्या भावात चढ-उतार होत राहतील. सोने १ लाखाच्या घरात गेले तरी लोकांची हौस फिटताना दिसत नाही. यात लग्नसराईची खरेदी करणाऱ्यांची संख्या अधिक आहे. केवळ आभुषणांपुरते सोन्याचे मूल्य मर्यादित नाही. प्रतिष्ठेचे ते एक लक्षण आहे शिवाय सुरक्षित गुंतवणुकीचा पर्याय आहे. भारतीय मानसिकता ही गुंतवणुकीकडे अधिक असते. मोलमजुरी करणाऱ्यांपासून ते श्रीमंतांपर्यंत सारेच सोन्यात सुख शोधत असतात. वेळप्रसंगी हेच हेच सोने अधिक मौल्यवान बनते. आरोग्य, शिक्षण, व्यवसाय किंवा लग्न कार्यासाठी आपले दागिने गहाण ठेवणाऱ्या महिलांची कमी नाही. सोने खरेदीमुळे दागिना अंगावर मिरवतानाच भविष्यातील संकटासाठीचीही तरतूद केलेली असते. गत काही वर्षात अनेक जण शेअर बाजाराऐवजी सोन्यात गुंतवणूक करण्याला प्राधान्य देत आहेत. हक्काचा परतावा हे त्या मागचे कारण आहे. भारतातच हा ट्रेंड आहे असे नाही. परदेशातही सोन्याचे आकर्षण कमी नाही. सुरक्षितता आणि परतावा या दोन्ही पातळीवर सोन्याचे महत्त्व इतर पर्यायांपेक्षा कित्येक पट अधिक आहे त्यामुळे सोन्याला सोन्याचे दिवस आले आहेत. जागतिक सुवर्ण परिषदेच्या अहवालानुसार २०२४ मध्ये भारतात ८०२ टन सोन्याची विक्री झाली. २०२३ मध्ये हीच विक्री ७६१ टन होती त्यामुळे भारताला सोन्याची अधिक आयात करावी लागत आहे. यंदा सोन्याला आणखी मागणी वाढली आहे. दर वाढत असले तरी त्याची मागणी कमी होणार नाही, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. छोटे-मोठे गुंतवणूकदारही सोन्याकडे वळण्याची चिन्हे आहेत. रशिया-युक्रेन युद्ध, पश्चिम आशियातील हिंसक संघर्ष याचा सोन्याच्या दरावर परिणाम झाला. या युद्धांमुळे सोन्याची मागणी घटेल, असा अंदाज होता; परंतु तसे झाले नाही. गत वर्षभरात चीनने आंतरराष्ट्रीय बाजारातून २०० टन सोने खरेदी केल्याचे समोर आले. अचानक चीनने ही खरेदी का केली, याबाबत तर्कवितर्क सुरू झाले. कारण जेव्हा जेव्हा चीन मोठी खरेदी करतो तेव्हा काही तरी घडते, असा आजवरचा अनुभव आहे. पीपीई कीटची विक्री थांबवून आंतरराष्ट्रीय बाजारातून हे कीट खरेदी करण्याचा सपाटा चीनने लावला तेव्हाच अनेकांना शंका आली होती. त्यानंतर कोरोनाच्या महामारीने जगभर हाहाकार माजवला होता. भारतानेही गतवर्षी चीनच्या हालचाली पाहून काही निर्णय घेतले. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने इंग्लंडमधील आपले १०२ टन सोने मायदेशी आणून ठेवले तसेच सुमारे १५ टन सोने नव्याने खरेदी केले. असाच कित्ता अमेरिका, जर्मनी, इटली, फ्रान्स आदी देशांनी गिरवला. परिणामी सोन्याच्या दरात तेजी दिसून आली. जागतिक स्तरावर अस्थैर्य असूनही सोन्याच्या मागणीवर त्याचा परिणाम झाला नाही. जगभरातील घडामोडी आणि हालचाली सोन्याच्या मागणी आणि किमतीवर परिणाम करणाऱ्या आहेत. घरगुती किंवा मोठ्या ग्राहकांना घरबसल्या सोन्यावर कर्ज देण्याची वित्तसंस्थांमध्ये चढाओढ आहे. या सेवेमुळेही सोन्याची मागणी वाढली आहे. स्थानिक पातळीपासून आंतरराष्ट्रीय स्तरावर सोन्याभोवती असे अर्थकारण आणि गुंतवणुकीचे शास्त्र गुंफले गेले आहे त्यामुळे सोन्याची झळाळी दिवसागणिक वाढते आहे. सोन्याचे दर चढे असो की अस्थैर्य असो जगभरात सोन्याचे ग्राहक वाढत आहेत. सोन्याच्या मागणीत तोळाभरही फरक पडत नाही, असो. सोन्याची खरेदी जपूनच करायला हवी मग मुहूर्त कोणता का असेना! कारण सोने खरेदी केल्यावर ते घरी ठेवणे जोखमीचे ठरू शकते मग त्यासाठी बँकेत लॉकर उघडावे लागते म्हणजे अतिरिक्त खर्च आलाच, सोन्याचा विमाही काढावा लागतो म्हणजे खर्चच खर्च.

# शिवसैनिकांनी शासकीय योजना जनतेपर्यंत पोहोचवाव्यात-डॉ.नीलम गोऱ्हे

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यात सध्या महायुतीचे सरकार प्रस्थापित झालेले असून महायुतीने सर्वसामान्य जनतेसाठी विविध हितदायी योजनांची उभारणी केलेली आहे. मात्र अजूनही तळागाळातील लोकांना या योजनांची सखोल माहिती पोहोचलेली नाही तर आपण बाळासाहेबांचे शिवसैनिक म्हणून तसेच महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून आपण महायुतीच्या विविध योजनांचा लाभ सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यात आपले योगदान देणे गरजेचे आहे तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक आणि जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर यांच्या मार्गदर्शनाखाली पदाधिकाऱ्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांची तयारीला लागावे याबरोबरच बीड जिल्ह्यात महिलांवर होणाऱ्या अत्याचारास आळा घालण्यासाठी महिला आघाडीने देखील स्वतःहून पुढाकार घ्यावा. तसेच महिला आघाडीचे संघटन आणखीन बळकट करावे व महिला आघाडीने महिलांच्या सबळीकरणासाठी महायुती सरकारने उभारलेल्या योजनांचा लाभ महिलांपर्यंत पोहोचवण्याकरिता प्राधान्याने पुढाकार घ्यावा



असे विधानपरिषद उपसभापती व शिवसेना नेत्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी बीड जिल्हा शिवसेनेच्या बैठकीत मार्गदर्शन केले.िय विश्रामगृह येथे सकाळी १०. ०० वाजता विधानपरिषद उपसभापती व शिवसेना नेत्या डॉ. नीलम ताई गोऱ्हे दाखल झाल्या. त्यांनी शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोक पटवर्धन, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर आणि महिला आयोग सदस्य तथा शिवसेना मराठवाडा महिला आघाडी संपर्कप्रमुख संगीता चव्हाण यांना सोबती घेऊन बीड जिल्ह्याच्या प्रशासनासोबत महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर सखोल चर्चा केली. या बैठकीत त्यांनी विविध स्थानिक समस्यांचा आढावा घेतला आणि आवश्यक उपाययोजना राबवण्याच्या सूचनाही दिल्या. डॉ. गोऱ्हे यांची ही दौरा केवळ भेट न राहता, जनतेच्या समस्या समजून घेऊन त्यावर प्रभावी निर्णय घेण्यासाठीचा एक सकारात्मक पाऊल होते. दरम्यान डॉ. नीलम ताई गोऱ्हेयांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना बीड जिल्ह्याची वतीने एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत डॉ. गोऱ्हे यांची यांनी शिवसेना पदाधिकाऱ्यांसोबत सविस्तर चर्चा करत मुक्त संवाद साधला. याप्रसंगी शिवसेना मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर आणि महिला आयोग सदस्य तथा मराठवाडा महिला आघाडी संपर्कप्रमुख संगीता चव्हाण यांच्यासह बीड जिल्हाशिवसेना, महिला आघाडी, युवासेना, शेतकरी सेना, ओबीसी सेना, अनुसूचित जाती-जमाती सेना, आजी-माजी लोकप्रतिनिधी, तसेच सर्व अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्यासंख्येने उपस्थित उपस्थित होते.

### “ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी पूर्ण ताकदीने कामाला लागा- अशोक पटवर्धन

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेल्या काही वर्षांपासून रखडल्या होत्या. विधानसभा निवडणुकीनंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे बिगुल वाजणार आहे. राज्यात शिवसेनेला मिळालेल्या अफाट यशानंतर बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्येही शिवसेनेचा भगवा फडकवण्यासाठी शिवसैनिकांनो पूर्ण ताकदीने कामाला लागा. शिवसेना सदस्य नोंदणीचे फॉर्म जास्त संख्येने भरून शिवसेना पक्ष संघटन मजबूत करा असे शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोक पटवर्धन साहेब यांनी बैठकीत मार्गदर्शन केले.

## पान १ वरून...

### मत्स्यव्यवसायाला

बळकटीकरण होणार आहे. यामुळे राज्याच्या मत्स्य उत्पादनामध्ये भरीव वाढ होणार आहे. नितेश राणे पुढे बोलताना म्हणाले की, कृषी क्षेत्रास लागणारे बियाणे, ट्रॅक्टर, औवजारे, खते इत्यादी करीता शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळतो. त्याचप्रमाणे मच्छीमारांना मत्स्यबीज खरेदी, खाद्य खरेदी, पॅडलव्हील एअरेटर्स, एअरपंप करीता आता मत्स्यव्यवसायिकांना अनुदान या निर्णयामुळे मिळणार आहे. शीतगृह व बर्फ कारखान्याला अनुदान, शेतकऱ्यांना मिळणाऱ्या पीक विमाप्रमाणे मत्स्य शेतकऱ्यांना, मत्स्य संवर्धकांना मत्स्यबीजांच्या मत्स्योउत्पादनाच्या नुकसानीसाठी मत्स्य विमा योजना, दुष्काळ किंवा अतिवृष्टी सारख्या नैसर्गिक आपत्ती आल्यास कृषी क्षेत्रात ज्याप्रमाणे शेतकऱ्यांना शासनातर्फे रिलीफ पॅकेज जाहीर होते त्याचप्रमाणे मच्छीमारांनाही शासनातर्फे रिलीफ पॅकेज मिळणार असल्याची माहिती दिली. शेवटी बोलताना नितेश राणे म्हणाले की, मत्स्यपालनाला कृषीचा दर्जा मिळाल्याने किनारी आणि अंतर्गत भागाचा आर्थिक विकास होणार आहे. याचबरोबर रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे. मत्स्यव्यवसायाला कृषीचा दर्जा मिळाल्याने मच्छीमार शेतकऱ्यांना वीज शुल्कात अनुदान मिळणार आहे. मत्स्य शेतकरी, मत्स्य संवर्धन प्रकल्प, संबंधित कारखाने, प्रक्रिया युनिट यांना कृषी दराने वीज मिळणार आहे. मत्स्य शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्ड, बँकांकडून कृषी दराने कर्ज सुविधा इत्यादी आणि कृषीनुसार अल्पदराने विमा संरक्षणाचा लाभ मिळण्यास मदत होणार असल्याचेही यावेळी सांगितले.

----------

### पर्यटकांवर मोठा दहशतवादी

जाता येते. या हल्ल्यात काही घोडेही जखमी झाले आहेत. दहशतवादी लष्कराच्या गणवेशात आले होते अशीही माहिती सूत्रांनी दिली. तसेच त्यांनी पर्यटकांना त्यांचा धर्म विचारल्याचा दावा हल्ल्यावेळी घटनास्थळी असलेल्या महिलेने केला. नागरिकांचे आयडीकार्ड पाहून त्यांच्यावर गोळीबार केला असल्याची माहिती महिलेने दिली आहे. हल्ला झाल्यानंतर जखमींना रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले आहे. दहशतवादी हल्ल्यानंतर सुरक्षा दलाकडून शोधमोहिम राबवली जात आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पहलगाममधील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली आहे. तसंच अमित शहा हे श्रीनगरला रवाना झाले आहेत. या हल्ल्यात सहभागी असलेल्यांवर कठोरात कठोर कारवाई केली जाईल. कोणालाही सोडलं जाणार नाही अशा शब्दात अमित शहा यांनी हल्ल्यानंतर प्रतिक्रिया दिली.

------------

### औरंगाबाद, नागपुर खंडपीठाला

काही शहरांतील उच्च न्यायालयांच्या इमारतींना देखील स्फोटाने उडवून देण्याची धमकी याआधी मिळाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेतली जात असून, संपूर्ण तपास सायबर पोलीस विभागाकडे सोपविण्यात आला आहे. धमकीचा मेल नेमका कोणी पाठवला ? कुठून पाठवला ? हे शोधण्यासाठी नागपूर पोलिसांची सायबर टीम सर्व तांत्रिक बाबींचा तपास करत आहे. दरम्यान, या घटनेमुळे नागपूर खंडपीठ परिसरात काही काळ तणावाचे वातावरण होते. मात्र, पोलिसांनी घेतलेल्या तातडीच्या उपाययोजनांमुळे परिस्थिती नियंत्रणात आणली गेली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाला देखील बॉम्बस्फोटाची धमकी देणारा एक ई-मेल प्राप्त झाला आहे. हा मेल चेन्नई येथून पाठवण्यात आल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या घटनेची माहिती मिळताच, पोलिसांनी संपूर्ण न्यायालय परिसरात कडेकोट बंदोबस्त तैनात केला आहे. न्यायालयाच्या सर्व प्रवेशद्वारांवर सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्यात आली असून, सुरक्षा यंत्रणा सतर्क आहेत. मंगळवारी दुपारी १२ वाजण्याच्या हा सुमारास ई-मेल आला. उच्च न्यायालय प्रशासनाने तत्काळ पोलिसांना याबाबत माहिती दिली, त्यानंतर पोलिसांनी खंडपीठ परिसरात तपास सुरू केला. न्यायालयाच्या संपूर्ण परिसरात बारकाईने तपासणी करण्यात येत आहे. अद्याप कोणतीही संशयास्पद वस्तू आढळलेली नाही. न्यायालयातील सर्व कामकाज नियमित सुरू आहे. नागरिकांना देखील न्यायालयात येण्यास परवानगी देण्यात आली आहे. पोलीस यंत्रणा दक्षतेने काम करत असून, सायबर पोलिसांकडून धमकीच्या ई-मेलचा सखोल तपास सुरू आहे.

------------

### अविनाश पाठक यांची बदली

बाजून घेत असल्याचा आरोप शेतकरी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्यावर करत होते. पाटोदा नगरसेवक अपात्र प्रकरण, शेतकऱ्यांचा मावेजा थकल्याप्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांची गाडी जप्त, दुसऱ्या प्रकरणात थेट अटकेचे आदेश, अवैध वाळू उपसा प्रकरण, गौन खणिज प्रकरण अशा विविध प्रकरणावरून ते सतत चर्चेत होते. जिल्हाधिकारी सर्वसामान्य नागरिकांचे काम न करता त्यांना कायदाच शिकवत असल्याचा आरोप होत होता. या प्रकरणी माध्यमातून अनेक बातम्या येत होत्या. अखेर मंगळवारी अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांनी आदेश काढून जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची बदली केली. बीडचे नवे जिल्हाधिकारी म्हणून विवेक जॉन्सन बीडला येत आहेत.

----------

### रमेशराव आडसकर अखेर अजित

रमेश आडसकर यांच्याबरोबर असंख्य कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीचे घड्याळ हाती बांधल्याने बीड जिल्ह्याच्या राजकारणात मोठ्या घडामोडी घडू शकतात.

--------------

### वक्फ कायद्यामुळे गरीब, गरजू मुस्लिमांना

ते बोलत होते. यावेळी खा. मेधा कुलकर्णी, भाजपा प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक आणि प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, भाजपा प्रदेश अल्पसंख्याक मोर्चाचे अध्यक्ष इद्रीस मुलतानी आदी उपस्थित होते. नोंदणीकृत वक्फ मालमत्ता किंवा अधिसूचनेद्वारे घोषित वक्फ मालमत्ता यांना हात लावणार नाही असेही रिजिजू यांनी स्पष्ट केले. किरण रिजिजू म्हणाले की, वक्फ बोर्डातील गैर-मुस्लिम सदस्यांच्या समावेशाबद्दल टीका करणाऱ्यांच्या एक लक्षात आणून देऊ इच्छितो की प्रयागराज येथील कुंभमेळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष आझम खान हे मुस्लिम होते. पण आम्ही कधीही असा विचारच केला नाही. या वक्फ (सुधारणा) कायदा २०२५ मुळे आता वक्फ बोर्डांना मनमानीपणे कुठल्याही मालमत्ता वक्फ म्हणून घोषित करता येणार नाहीत. साहजिकच हा कायदा संपूर्ण गावेच्या गावे 'वक्फ' म्हणून घोषित करण्यासारख्या गैरवापरांना प्रतिबंध करणार आहे. या कायद्याचे अनेक गरीब मुस्लिम बांधव आणि गटांनी समर्थन केले आहे. हा कायदा मंजूर केल्याबद्दल पंतप्रधान मोदींचे पसमंदा, बोहरा, अहमदिया यांसारख्या समाजांनी आभार मानले आहेत. या समुदायाच्या मुख्य मागण्या या कायद्यात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. या कायद्यामुळे मुस्लिमांच्या धार्मिक बाबींमध्ये हस्तक्षेप केला जाईल या मतपेढीच्या राजकारणासाठी विरोधक पसरवत असलेल्या केवळ अफवा आहेत त्यामध्ये तथ्य नाही असेही यावेळी नमूद केले. किरण रिजिजू पुढे बोलताना म्हणाले की, खासगी मालमत्तांना 'वक्फ मालमत्ता' म्हणून घोषित करण्यासाठी 'वक्फ कायद्या'च्या 'कलम ४०'चा मोठ्या प्रमाणात गैरवापर केला जात होता. आता 'वक्फ' मालमत्तेचे निष्पक्ष आणि पारदर्शक प्रशासन सुनिश्चित करण्यासाठी 'वक्फ कायद्या'तील 'कलम ४०' रद्द केले जात आहे असेही यावेळी स्पष्ट केले. शेवटी बोलताना किरण रिजीजू म्हणाले की, नियमानुसार आता मुतवल्लींना सहा महिन्यांच्या आत केंद्रीय पोर्टलवर मालमत्तेची माहिती नोंदवावी लागेल. पोर्टलद्वारे 'वक्फ मालमत्ता' व्यवस्थापन स्वयंचलित करेल, ज्यामध्ये नोंदणी, ऑडिट, खटले यांचा समावेश असेल, ज्यामुळे व्यवस्थेत पारदर्शकता येणार आहे. कोणत्याही स्वरुपांच्या वादांचे निराकरण जिल्हाधिकारी करतील, जे राज्याला अहवाल देणार असल्याचेही यावेळी सांगितले.

--------------

### पंकजा मुंडेंचा प्रदेश कार्यालयात

मंत्री महोदयांचा 'जनता दरबार' हा उपक्रम जाहीर करण्यात आला होता. या उपक्रमांतर्गत पहिला जनता दरबार घेण्याचा मान ना. पंकजाताई मुंडे यांना मिळाला. आज दुपारी ३ ते ५ वा. दरम्यान ना. पंकजाताईंनी जनता दरबार घेतला. राज्याच्या विविध भागातून आपल्या समस्या घेऊन लोकं आली होती. आलेल्या प्रत्येक नागरिकांच्या समस्या त्यांनी जाणून घेतल्या, त्यांची गाऱ्हाणी ऐकली, निवेदने स्वीकारली आणि त्यांच्या प्रश्नांचे जागेवर निराकरण केले. पर्यावरण व पशुसंवर्धन विभागासह अन्य विभागाची कामे घेऊन आलेल्या कामांचाही त्यांनी यावेळी निपटारा केला. भाजपचा हा उपक्रम खरोखरच स्त्युत्य असा आहे, या पहिल्याच जनता दरबाराला खूप चांगला प्रतिसाद मिळाला. पक्षाच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह सर्व सामान्य जनतेशी थेट संवाद साधता आला असं जनता दरबार झाल्यानंतर त्यांनी माध्यमांशी बोलतांना सांगितलं.

-------------

### माजलगावचे ढाबाचालक महादेव गायकवाड

कृष्णा माणिकराव थावरे यांचा हॉटेलचे बिल देण्यावरून वाद झाला.या वादाचे रूपांतर हाणामारीत झाल्यानंतर बाजूलाच असलेली लाकडी ढिलपी उचलून महादेव गायकवाड यांच्या डोक्यात घालण्यात आली. तर महादेव गायकवाड यांचा मुलगा आशुतोष गायकवाड हा देखील या मारहाणीत जखमी झाला.दोघांनाही उपचारासाठी माजलगावच्या संजीवनी हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले होते.यापैकी महादेव गायकवाड यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.याप्रकरणी आशुतोष गायकवाड यांच्या फिर्यादीवरून माजलगाव ग्रामीण ठाण्यात रोहित शिवाजीराव थावरे व अन्य दोन अनोळखी तरुणांविरुद्ध गुन्हा नोंद झाला होता. या घटनेत कृष्णा माणिकराव थावरे आणि ऋषिकेश रमेशराव थावरे यांचा सहभाग निश्चित करण्यात आला होता. त्यावरून पोलिसांनी या तिघाही आरोपींना पुण्यातील नगर परिषद चौक आळंदी येथून ताब्यात घेतले आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने,पोलीस अंमलदार भागवत शेलार,महेश जोगदंड, तुषार गायकवाड,राजु पठाण बप्पासाहेब घोडके,सुरवसे,चालक गणेश मराडे यांनी केली.

----------------

### सोन्याने गाठला

येणारी अक्षय तृतीया भारतात सोने खरेदीसाठी अत्यंत शुभ मानली जाते. शिवाय, मे अखेरपर्यंत चालणारा लग्नसराईचा हंगाम यामुळे बाजारात सोन्याची खरेदी वाढली आहे. या दोन्ही घटकांमुळे सोन्याच्या किमतीवर स्पष्ट परिणाम दिसून येत आहे. तज्ज्ञांच्या मते, सध्याच्या परिस्थितीत अक्षय तृतीयापर्यंत सोन्याच्या किमतीत आणखी तेजी येण्याची शक्यता आहे.

-----------

## पान ६ वरून...

### तरुणींना कोणी त्रास देत असेल तर त्याची

ॲड. संगीता चव्हाण, जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलदर, महिला जिल्हाप्रमुख रत्नमाला आंधळे, युवासेना रविराज बडे आणि अन्य कार्यकर्ते उपस्थित होते. साक्षीच्या आत्महत्येप्रकरणी सरकार आणि पोलीस प्रशासन ठोस पावले उचलत असल्याचे उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी यावेळी म्हटले.

-------------

### चिमुकल्या सोमेश्वरपुत्रांनी

हवालदिल होतो, तिथे मुकजीवांची काळजी कोण घेणार ? चोंच उघडी ठेवुन व्याकुळलेल्या चिमण्या चारा-पाण्याच्या शोधासाठी धावाधाव करतात म्हणुन पाणवठ्यांत नियमित पाणी टाकणे आणि अन्न टाकण्याचा संकल्प शाळकरी बालमित्रांनी केला आहे. भुतदयेच्या भावनेतुन योगेश ठोंबरे, प्रसाद कस्तुरे, विश्वजित गंभीरे यांच्यासह सोमेश्वरपुत्रांनी उभारलेल्या पानवठ्यांचे सर्व स्तरातुन कौतुकासह अभिनंदन करण्यात येत आहे.

----------

### पाटोदा एसटी महामंडळाची

पंधरा वर्षापासून फुल शेती आहे नागरगोजे इतरच्या शेतकऱ्यांना म** घेऊन बीडला एसटी पार्सलने पाठवतात गेल्या दीड महिन्यापासून पाठवून देतील एसटी पार्सल व्यवस्था बंद आहे त्यामुळे नागरगोजे यांना फुल पाठवण्यास अडचणी निर्माण होत आहेत नागरगोजे यांनी तहसीलदाराकडे तक्रार मांडण्याचा प्रयत्न केला मात्र तहसीलदार दौऱ्यावर होते तर अगर प्रमुखांनी पार्सल व्यवस्था खाजगी कंपनीचे असल्याने आम्हाला हस्तक्षेप करता येत नसल्याने सांगितले. त्यामुळे नागरगोजे स्वतः दुचाकीवरून बीडला पोहोचवत आहेत त्यामुळे खर्च वाढला असून फुल शेती. अवघड विषय झाला आहे. खाजगी कंपनीच्या मनमानीचा फटका शेतकऱ्यांना बसू लागला आहे.

-------------

### साहित्य ज्योती पुरस्कार

तोडणीच्या मोसमात, मालती मडावी /सेमले, गडचिरोली, सावित्रीच्या कविता, डॉ. रेखा ढगे धाराशिव, डबल ढोलकी, प्रभाकर शेळके, जालना, ॲडजस्टमेंट, मेघना साने, ठाणे, बे दुणे शून्य , रवींद्र रेखा गुरव, इचलकरंजी, बाल साहित्य२०२४ फुलांची शाळा, अलका सपकाळ, भुम, गडीवरची हडळ, ज्योती सोनवणे, छत्रपती संभाजीनगर, या पुरस्कार निवडीमध्ये मा. प्रा.डॉ. जे पी बोडके , मा. इंद्रकुमार झांजे, मा. माधव सावंत, डॉ. हरिष हातवटे, श्रीम. संगीता होळकर ओटे, मा. प्रा. डॉ. अभय शिंदे,मा. नवनाथ पोकळे,मा,संदीप पाचरणे, इत्यादींचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. सर्व पुरस्कार विजेत्यांचे मा. आ. भिमराव धोंडे, (संस्थापक अध्यक्ष शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी)मा. डॉ. अजय दादा धोंडे, प्राचार्य डॉ. एस .जी विधाते, प्राध्यापक सय्यदअलाउद्दीन, दै. झुंजार नेताचे उपसंपादक उत्तम बोडखे, इत्यादींनी अभिनंदन केले आहे. लवकरच मान्यवर साहित्यिकाचे हस्ते, या पुरस्काराचे वितरण कडा ता.आष्टी येथे होणार आहे.असे संयोजक कवी नागेश शेलार यांनी सांगितले आहे..

-------------

### भीमजयंतीसाठी नागरिकांनी मोठ्या

महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त प्रथमच विविध कार्यक्रमाचे रेलचेल पाहायला मिळणार आहे यामध्ये महाराष्ट्रातील प्रसिद्ध शाहीर शितलताई साठे यांचा शाहिरी जलसा तसेच मोफत आरोग्य तपासणी, भव्य रक्तदान शिबिर, पुस्तकांचे वाटप तसेच भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचा आव्हान आयोजित भीम जयंती कमिटी अध्यक्ष अशोक शेलार, किरण गायकवाड, स्वप्निल शेलार, नितीन शेलार, बाळासाहेब गायकवाड, दीपक शेलार, अमोल शेलार, यांनी आव्हान केले आहे.

**विचाराच्या महामानवाला रक्तदानातून**
**अभिवंदन करण्याची संधी : सचिन पवार**

कुसळंब येथे प्रथमच भव्य दिव्य अशी भीम जयंती मोठ्या उत्साहात साजरी होत असून विविध सामाजिक उपक्रमातून जयंती साजरी करण्याचा संकल्प केला आहे. रक्तदान शिबिर करून महामानवाला अभिवादन करण्याचा संकल्प केला असल्याने कुसळंबसह परिसरातील नागरिकांनी रक्तदान शिबिरात सहभाग नोंदवून रक्तदान करून महामानवाला अभिवादन करावे असे आव्हान पत्रकार सचिन पवार यांनी केले आहे.

----------

### वडवणीचे गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब

पुरस्काराने प्रत्येक वर्षी गौरव केला जातो. संविधान दिनाच्या निमित्ताने दिल्या जाणाऱ्या या राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा नुकतीच करण्यात आली असून विविध क्षेत्रातील मान्यवरांना हा पुरस्कार दिला जाणार आहे. यामध्ये प्रशासकीय क्षेत्रातून बीड जिल्ह्याच्या शिक्षण क्षेत्रात वडवणी तालुक्याची उत्तुंग भरारी घेणारे वडवणी तालुक्याचे अभ्यासू, कर्तव्यदक्ष, कार्यतत्पर तथा शिक्षकप्रिय गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांना प्रतिष्ठेचा पद्मपाणी राज्यस्तरीय पुरस्कार २०२५ (उत्कृष्ट प्रशासक) हा नुकताच जाहीर झाला असून या पुरस्काराबध्दल त्यांच्यावर शिक्षण क्षेत्रासह सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे. वडवणी गटशिक्षणाधिकारी कार्यालयात सर्व कर्मचारी वृंद यांच्या वतीने पुरस्कार प्राप्त गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांचा काल सोमवारी स्वागत सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर तालुक्यातील इतर सर्व शिक्षक बंधू भगिनी यांनीही त्यांचे स्वागत करुन अभिनंदन केले. दरम्यान आपणांस हा पुरस्कार जाहीर झाल्याचे समजताच खुप आनंद झाला असून केलेल्या चांगल्या कामाची पोहोच या माध्यमातून मिळत आहे. दरम्यान हा पुरस्कार माझा एकट्याचा नसून यामध्ये नव्या शैक्षणिक उत्क्रांतीसाठी अहोरात्र परिश्रम घेणाऱ्या माझ्या कार्यक्षेत्रातील सर्व कर्मचारी व शिक्षक बांधवांचे शेकडो हात यासाठी लागलेले आहेत. वडवणी तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक बंधू-भगिनी व गटसाधन केंद्रातील सर्व कर्मचारी बांधव यांनाच हा पुरस्कार समर्पित असून त्यांच्या सहकार्यानेच वडवणी तालुक्याची सतत शैक्षणिक भरभराट होत आहे. या पुरस्काराबध्दल पद्मपाणी प्रतिष्ठानचे आभार मानतो व यापुढेही सर्वांगाने वडवणी तालुक्यातील शैक्षणिक उन्नतीसाठी, विकासासाठी कायम तत्पर राहील असेच या निमित्ताने सांगतो अशी प्रतिक्रिया पुरस्कार जाहीर झाल्यानंतर गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी व्यक्त केली.

-----------

### भाजप जनता पार्टी हा सर्वसामान्य

संघाचे राजकीय अंग मानले जात असे. काँग्रेस व तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्याकडून पाकिस्तानचे होणारे लांगूलचालन रोखणे व भारतामधील हिंदूंचे हित जपणे ही जनसंघाची उद्दिष्टे होती. स्थापनेनंतर जम्मू आणि काश्मीर भारतामध्ये संपूर्ण सामावून घेतला जावा अशी आग्रही भूमिका जनसंघाने घेतली व या दरम्यान आंदोलन करताना अटक झालेल्या मुखर्जी यांचे काश्मीरच्या तुरुंगातच निधन झाले. दीनदयाल उपाध्याय व त्यानंतर अटलबिहारी वाजपेयी व लालकृष्ण अडवाणी या तरुण नेत्यांनी जनसंघाची सूत्रे हातात घेतली. १९५२ सालच्या पहिल्या लोकसभा निवडणुकीमध्ये जनसंघाला केवळ २ जागांवर विजय मिळाला होता. त्यावेळी भारतीय जनता पक्षाला दोन खासदार असण्यावरून हिणवले तोच भारतीय जनता पक्ष संघटन सातत्य आणि निश्चयाच्य बळावर ३ वेळा केंद्रात सरकार स्थापन करण्यात यशस्वी ठरला. यावेळी भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

--------------

### विभागीय आयुक्त साधणार पाणीटंचाइ

क्युआर कोडही प्रसिध्द करण्यात येत आहे. नागरिकांना आपल्या मोबाईलव्दारे या उपक्रमात सहभागी होता येणार आहे. तरी मराठवाडा विभागातील पाणीटंचाईग्रस्त गावांतील नागरिकांनी या संवादात सक्रिय सहभागी व्हावे, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात येत आहे.

-----------

### जीवनात यशस्वी होण्यासाठी विजेत्यांसारखी

मत व्यक्त केले. या वेळी इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा सौ.सुरेखा सिरसाट यांनी मुलांना मोलाचे मार्गदर्शन करताना खेळ आणि जीवन यात खूप साम्य आहे असे सांगत खेळ खेळण्यासाठी आणि जीवन जगण्यासाठी सकारात्मक ऊर्जा निर्माण करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. शारदा शिक्षण संस्थेचे प्राचार्य भूषण गवळी यांनी मुलांना मार्गदर्शन करताना सांगितले की संयमी क्रिकेट खेळून मुलांनी आपल्यात असलेल्या कला गुणांना वाव द्यावे, लहान वयातच आधुनिक लेदरबॉलचे प्रशिक्षण मिळते, भविष्यात मोठे खेळाडू बनू शकतात असे मनोगत व्यक्त केले. या स्पर्धेत आयुष एकादश संघाने विजेतेपद पटकावले तर शिवम व्हिजन एकादश संघाला उपविजेतेपद मिळाले. यावेळी विजयी खेळाडूंना जैन एजन्सीज व सौ रेहाना पाटील यांच्या कडून विजयी खेळाडूंना रोख पारितोषिक, ट्रॉफी व मेडल देऊन गौरविण्यात आले. प्रमुख अतिथींचे स्वागत सुरज कांबळे रूपेश जाधव, माही परमार, लीना किथे, सौ.चोबे, सौ.पवार, गौरव कुलकर्णी, सौ.रेहाना यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोहित परमार, माही परमार यांनी केले तर आभार प्रदर्शन निलेश मुथा यांनी केले. स्पर्धेच्या आयोजनात इनर व्हील क्लब यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. तसेच स्पर्धा यशस्वी करण्यासाठी क्रिकेट अकादमीचे मोहित परमार, अलोक भारती, यशवंत शिनगारे, शिवम पाटील, प्रणव केंद्रे, आयुष दामा यांनी परिश्रम घेतले.


### टी.सी हरवला आहे

रामेश्वर शेषराव मिरकर रा. हसनापूर ता.अंबड.जि जालना

संत रामदास आर्ट्स कॉमर्स सायन्स कॉलेजचा बीएससी चा टी.सी घनसांगी अंबड जालना प्रवास दरम्यान हरवली आहे. ज्या कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर सपर्क करा.

**संपर्क: मो.८६०५९८२४४७**

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि.२३ एप्रिल २०२५



## आदर्श देवगाव मध्ये क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील आदर्श देवगाव या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त , देवगाव प्रीमियर लीग २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे, उद्घाटन समारंभ दिनांक १,५ २०२५ वार गुरुवार रोजी सकाळी, दहा वाजता होणार आहे, या उद्घाटन प्रसंगी उपस्थित प्रमुख पाहुणे, परडी माटेगाव चे विद्यमान सरपंच माधव काका शेंडगे, ज्ञानेश्वर दादा सुरवसे ऊस उत्पादक आदर्श शेतकरी तथा माजी सरपंच , डॉ, संदिपान सुरवसे, इंजिनीयर जगदीश काका फरताडे, महादेव सुरवसे सामाजिक कार्यकर्ते तथा उपसरपंच, विद्यमान सरपंच मुकुंद सुरवसे, उत्तम बप्पा सुरवसे, युवा पत्रकार अंकुश गवळी, सदर मान्यवरांच्या उपस्थित उद्घाटन समारंभ संपन्न होणार आहे, , व गावातील व परिसरातील काही क्रिकेट प्रेमींनी विशेष सहकार्य यावेळी करण्यात आलेले आहे, यावेळी प्रथम बक्षीस परडी माटेगाव चे विद्यमान सरपंच माधव शेंडगे व ज्ञानेश्वर सुरवसे यांच्यावतीने तेतीस हजार तीनशे तेहतीस रुपयांचं प्रथम बक्षीस, द्वितीय बक्षीस, शेतकरी नेते इंजिनीयर जगदीश काका फरताडे यांच्या हस्ते १७ हजार ७७७ रुपये बक्षीस, तृतीय बक्षीस, महादेव अण्णा सुरवसे उपसरपंच तथा सामाजिक कार्यकर्ते देवगाव यांच्या हस्ते अकरा हजार अकराशे रुपयांचे बक्षीस, देण्यात येणार आहे, पंचक्रोशीतील क्रिकेट प्रेमी ने मोठ्या संख्येने क्रिकेट स्पर्धा पाहण्यासाठी आदर्श देवगाव माजलगाव धरणाच्या कुशीत होणार आहेत

# मराठी पत्रकार परिषदेचे ४४ वे राष्ट्रीय अधिवेशन शेगावमध्ये-देशमुख

## एस एम देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली शेगावात झाली पहिली आढावा बैठक

शेगाव। प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषदेचे ४४ वे राष्ट्रीय अधिवेशन बुलढाणा जिल्ह्यातील संतनगरी शेगाव येथे होणार असल्याची माहिती मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख सरांनी दिली. अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर शेगाव नगरीमध्ये पहिली आढावा बैठक उत्साहात पार पडली. बैठकीत अधिवेशन यशस्वीरित्या पार पाडण्याचा विश्वास उपस्थित पदाधिकाऱ्यांनी दिला. येत्या ऑगस्ट महिन्यामध्ये मराठी पत्रकार परिषदेचे ४४ वे राष्ट्रीय अधिवेशन हे बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव नगरीमध्ये घेण्याचा निर्णय नांदेड येथील बैठकीत झाला होता. त्यानंतर संतनगरी शेगाव मध्ये प्रत्यक्ष भेट देऊन मुख्य विश्वस्त श्री.एस.एम. देशमुख सर यांच्या अध्यक्षतेखाली ही पहिली बैठक पार पडली. यावेळी परिषदेचे प्रदेश सरचिटणीस सुरेश नाईकवाडे प्रदेश उपाध्यक्ष चंद्रकांत बरदे,डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, प्रदेश प्रतिनिधी युवराज वाघ, प्रदेश उपाध्यक्ष अनिल उंबरकर, बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीतसिंह राजपूत, राजेश डीखोळकर, गणेश चौकशे यांची प्रमुख उपस्थिती होती.



बैठकीत आगामी राष्ट्रीय अधिवेशना संदर्भात मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख सर यांनी माहिती दिली. अधिवेशन यशस्वीरित्या यशस्वी करण्याचे आव्हान यावेळी श्री.एस.एम.देशमुख सरांनी केले. या आव्हानाला प्रतिसाद देत शेगाव येथील पदाधिकारी राजेश चौधरी,धनराज ससाने,नंदू कुलकर्णी,अनिल उंबरकर यांनी आपले मनोगत व्यक्त करून परिषदेची शेगाव टीम सज्ज असून तन-मन-धनाने सहकार्य करण्याची ग्वाही दिली. त्यावर मराठी पत्रकार परिषदेचे राज्य उपाध्यक्ष चंद्रकांत बर्दे यांनी बुलढाणा जिल्हा सक्षम असून बुलढाणा जिल्हा या अधिवेशनाची सर्व ताकदीनिशी जबाबदारी उचलणार असल्याची ग्वाही देत अधिवेशन यशस्वी करण्याचा मानस व्यक्त केला. परीषदेचे प्रदेश सरचिटणीस सुरेश नाईकवाडे यांनी अधिवेशनाला ज्या ज्या अडचण येतील त्या त्या सोडवण्यासाठी सदैव तत्पर असल्याचे उपस्थितांना आश्वासित केले. परिषदेचे प्रदेश सरचिटणीस सुरेश नाईकवाडे तसेच डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांच्याकडे या अधिवेशना संदर्भात वेळोवेळी आढावा घेण्याचे आदेश यावेळी मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख सर यांनी दिले. बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजितसिंह राजपूत यांनी जिल्ह्यातील तेराही तालुक्यात परिषदेच्या शाखांचे गठन झाले असून तेराही शाखेचे पदाधिकारी वेगवेगळ्या समितीच्या माध्यमातून अधिवेशनात सहभागी होतील अशी माहिती दिली. प्रारंभी मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख सर,सौ शोभना देशमुख, प्रदेश सरचिटणीस सुरेश नाईकवाडे प्रदेश उपाध्यक्ष चंद्रकांत बरदे डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे या पदाधिकाऱ्यांचा शेगाव तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष नंदू कुलकर्णी,उपाध्यक्ष संजय त्रिवेदी, कार्याध्यक्ष राजकुमार व्यास,कोषाध्यक्ष मंगेश ढोले, डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष नारायण दाभाडे,राजवर्धन शेगावकर,शेगाव तालुका उपाध्यक्ष इस्माईल,गजानन ददगाळ आदींनी सत्कार केला. युवा क्रांती न्यूज चे संपादक विजय यादव यांनी परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम. देशमुख सर यांच्या सह मान्यवरांचा भगवे दुपट्टे व श्री संत गजानन महाराजांची प्रतिमा भेट देऊन त्यांचा सन्मान केला. बैठकीला मराठी पत्रकार परिषद शाखा खामगाव तालुका अध्यक्ष महेश देशमुख,शहराध्यक्ष गणेश पांजाडे,संग्रामपूर तालुकाध्यक्ष विवेक राऊत,स्वप्निल देशमुख, ज्ञानेश्वर दांदळे आदीसह घाट्याखालील जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. संचलन बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष प्रशांत देशमुख यांनी केले. तर आभार शेगाव तालुका पत्रकार संघाचे सचिव नितीन घरडे यांनी मानले.

## बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतरच कोरडेठाक पाणवठ्यात पाणी सोडण्यासाठी जाग येते का?

### पाणवठ्याच्या दर्जेदार दुरूस्तीची आवश्यकता- डॉ.ढवळे



लिंबागणेश। प्रतिनिधी

ऐन उन्हाळ्यात पाण्याअभावी वन्यजीवांचे हाल सुरू असल्याचे गंभीर चित्र पहायला मिळते.वनविभागाकडून वन्यप्राण्यांच्या पिण्याच्या पाण्याकडे दुर्लक्ष केले जात आहे.दिवसेंदिवस उन्हाचा पारा चढत असुन वन्यप्राण्यांची पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती सुरूच असुन त्यांची होणारी ससेहोलपट पाहता वनविभागाने बांधलेल्या कृत्रिम पाणवठ्यात नियमितपणे पाणी सोडावे हि वन्यप्रेमींची अपेक्षा असते. मात्र वनविभागाला याचे गांभीर्य नसुन सामाजिक कार्यकर्ते यांनी तक्रार केल्यानंतर आणि याबाबत विविध दैनिकात बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतरच वनविभागाला जाग येते आणि दुस-या दिवशी कोरड्याठाक पाणवठ्यात पाणी सोडले जाते. त्यामुळे दरवर्षी उन्हाळ्यात सामाजिक कार्यकर्ते यांच्या तक्रारी व दैनिकात बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतरच जाग येते का?? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.

बीड तालुक्यातील करचुंडी वनक्षेत्रांतर्गत बेलगाव,पिंपरनई, फुकेवाडी,सोमनाथवाडी लगत असलेल्या वनक्षेत्रात हरिण,मोर, लांडोर,वानर आदि वन्यजीव वास्तव्य करतात.वनक्षेत्रातील कृत्रिम पाणवठे कोरडेठाक पडल्याने तहानलेले वन्यजीव मानवी वस्ती कडे धाव घेत असल्याचे चित्र दिसून येते.काही ठिकाणी कृत्रिम पाणवठे कोरडेठाक तर काही ठिकाणी महिनाभरापूर्वी सोडलेल्या पाण्यात मोठ्या प्रमाणात शेवाळ साचल्याने पाणी पिण्यास योग्य नाही. त्यामुळे वनविभागाने कृत्रिम पाणवठ्यात नियमित पाणीपुरवठा करून शेवाळ साचलेल्या ठिकाणी स्वच्छता करून पिण्यायोग्य पाणी वनविभागाने उपलब्ध करून द्यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी २ दिवसांपूर्वी केली होती.याविषयी विविध दैनिकात बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. त्यानंतर वनविभागाला जाग आली आणि त्यांनी पाणवठ्यात पाणी सोडले.साचलेल्या शेवाळाची साफसफाई केली. वन विभागामार्फत बांधण्यात आलेल्या कृत्रिम पाणवठ्यांची उन्हाळ्यापुर्वी देखभाल आणि आवश्यक त्याठिकाणी दुरूस्ती करण्याची आवश्यकता आहे. याकडे वनविभागाचे दुर्लक्ष असुन भेगा पडलेल्या,तडे गेलेल्या पाणवठ्याण पाणी टीकुन रहात नाही.वनविभाग वरून सिमेंट आणि वाळुच्या साह्याने भेगा बुजविण्याचा थातुरमातुर प्रयत्न करताना दिसत आहे.मात्र याचा फारसा उपयोग होताना दिसत नाही.त्यामुळे पाणवठा दुरूस्तीची कामे दर्जेदार करण्यात यावीत अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

## तट बोरगाव येथे पोकरा प्रकल्पांतर्गत लोकसहभागीय सूक्ष्म नियोजन प्रक्रिया



अंबाजोगाई । प्रतिनिधी

ता तुतट बोरगावची नानाजी देशमुख कृषी संजीवनी (पोकरा) प्रकल्प टप्पा क्रमांक दोन मध्ये निवड झाली आहे.गावात पाण्याच्या ताळेबंदानुसार मृदा व जलसंधारणाची कामे करण्यासाठी संरक्षित सिंचन,शेती उपयोगी अवजारे, पाण्याचा वापर, शेतीमाल प्रक्रिया उद्योग,वैयक्तिक लाभाच्या योजना आदींबाबतचे नियोजन करण्यासाठी उपविभागीय कृषी अधिकारी गायकवाड, तालुका कृषी अधिकारी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी विभागामार्फत लोकसहभागीय सूक्ष्म नियोजन प्रक्रियेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर उपक्रमांतर्गत कृषी सहाय्यक पंडित काकडे व शिवप्रसाद येळकर यांनी प्रथमदिनी गावामध्ये ग्रामस्थांच्या मदतीने मशाल फेरी आयोजित करून प्रकल्पाची जनजागृती केली. त्यानंतर ग्रामस्थांची बैठक घेऊन येळकर यांनी प्रकल्पांतर्गत असलेल्या योजनांची विस्तृत माहिती दिली. तसेच कृषी सहाय्यक पंडित काकडे यांनी सूक्ष्म नियोजन आराखडा तयार करण्यासाठी करावयाचे नियोजन बाबत चर्चा केली. शालेय विद्यार्थ्यांच्या माध्यमातून प्रभात फेरी, हवामान अनुकूल तंत्रज्ञान लक्षगट चर्चा,गाव नकाशा या माध्यमातून गावाची असलेली संसाधने व प्रकल्पांतर्गत करावयाची कामे बाबत ऊहापोह करण्यात आला. दुसऱ्या दिवशी श्रमदान, शिवार फेरी आयोजित करून माती परीक्षण, पाण्याचा ताळेबंद व पीक निहाय आराखडा, शेती प्रक्रिया उद्योग व मूल्य साखळी बाबत चर्चा करून बाबी आराखड्यामध्ये समाविष्ट करण्यात आल्या, तिसऱ्या दिवशी महिलांची ग्रामसभा घेऊन महिलांसाठी कृषी प्रक्रिया उद्योग उभारणीच्या अनुषंगाने मार्गदर्शन करून महिलांनी कळवलेल्या कृषी प्रक्रिया उद्योगांची माहिती आराखड्यात नोंदवण्यात आली, शिवार फेरी आयोजित करून मृद व जलसंधारणाची कामे आधारे पुढील नियोजन तसेच हवामान अनुकूल आराखडा तयार करण्यासाठी बैठक घेऊन आराखडा तयार करण्यात आला. सदर प्रक्रियेमध्ये सरपंच विठ्ठल शितोळे, कृषी संजीवनी समितीचे सर्व सदस्य, बचत गटाच्या महिला, कृषी पर्यवेक्षक माचवे व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा आराखडा तयार केला.

## पोलीस उप महानिरीक्षक अशोक धिवरे यांचा विद्यार्थ्यांशी संवाद

बीड

बीडच्या शिक्षण क्षेत्रामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांचा वैचारीक बारसा चालवणारे श्री. अशोक घोलप यांच्या शिक्षण संकुलाला काल दि.२१ एप्रिल रोजी राज्याचे पोलीस उप महानिरीक्षक (निवृत्त) श्री. अशोक धिवरे यांनी भेट दिली. त्यांच्या हस्ते २० गरजू विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप करण्यात आले. त्याच बरोबर इतरही अनेक विद्यार्थ्यांना आर्थिक व शैक्षणिक साहित्याची मदत करण्यात आली.

श्री. अशोक घोलप यांनी सामाजिक जाणिवेतून सुरु केलेल्या घोलप क्लासेसच्या माध्यमातून आजपर्यंत ५०० हून अधिक मुला-मुलींना मोफत सायकलचे वाटप केले आहे. एव्हडेच नाही तर आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या असंख्य विद्यार्थ्यांना या क्लासेसमध्ये दरवर्षी मोफत शिक्षण दिले जाते. त्यामुळेच बीड शहरातील अत्यंत नावाजलेल्या या क्लासेसला मोठ्या प्रमाणात समाज मान्यता मिळालेली आहे. अलीकडे खाजगी कोचिंग क्लासेसच्या माध्यमातून जी आर्थिक नफेखोरी केली जात आहे त्यामध्ये घोलप क्लासेस अपवाद ठरले असून त्यांनी आपली आई स्व. इंदिराबाई घोलप यांच्या स्मृती प्रित्यर्थ फार मोठे सामाजिक आणि शैक्षणिक दायित्व निभावलेले आहे. दि.२१ एप्रिल रोजी बीडचे अत्यंत नावाजलेले पोलीस अधिक्षक आणि पोलीस उप महानिरीक्षक पदावरुन निवृत्त झालेले श्री. अशोक धिवरे यांनी आवर्जुन घोलप क्लासेसला भेट दिली. विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला. या प्रसंगी बोलतांना ते म्हणाले की, पुस्तकी ज्ञानाबरोबर विद्यार्थ्यांच्या मनावर चांगले संस्कार होणे आवश्यक आहे. ही जबाबदारी प्रामुख्याने आई-वडिलांची आहे. सलील कुलकर्णी यांच्या कवितेतील 'दमलेला बाबा' आणि वास्तवातील घराघरामध्ये दिसणारे बाबा यामध्ये खुप फरक जाणवतो. अलीकडच्या काळातील वडिलांना आपल्या मुलांबर १संस्कार घडवण्याचा नैतिक अधिकार राहिला आहे का? यावर आत्मचिंतन करण्याची गरज आहे. बडिलच खोटं बोलत असतील, चुकीचं वागत असतील, व्यसन करत असतील तर ते आपल्या मुलाला चांगले वागायला सांगू शकतील का? अलीकडच्या काळात बदललेल्या पिढीमध्ये हे वास्तव पहायला मिळते. संस्काराचा अभाव झाल्यामुळे सामाजिक चित्र बदलले. घराची कळा अंगण सांगते तसे कोणत्याही शहराची ओळख ही त्या शहरात राहणाऱ्या नागरिकांच्या संस्कारावरुन होते. सकारात्मक विचार करा, खरे बोलायला घाबरु नका, खोटं बोलणाऱ्यांना विरोध करा असा मौलिक सल्ला देतानाच त्यांनी एका कवितेच्या माध्यमातून माणूसकीचा राष्ट्रधर्म काय आहे? हे विद्याथ्यर्थ्यांना सांगितले.

## गाढे पिंपळगाव येथे नाल्यांची साफसफाई नसल्याने पाणी रस्त्यावर

परळी । प्रतिनिधी

तालुक्यातील गाढे पिंपळगाव येथील नाल्यांची साफसफाई नसल्याने नाल्यांचे पाणी रस्त्यावर वाहत असल्याने मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी पसरली असून नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. ग्रामपंचायतने साफसफाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

गाढे पिंपळगाव येथे गेल्या अनेक दिवसांपासून नाल्यांची साफसफाई केली जात नसल्याने नाल्या तुंबल्या आहेत. तुंबलेल्या नाल्यांमुळे नालीतील घाण पाणी रस्त्यावरुन वाहत असल्याने परिसरात दुर्गंधी पसरली आहे. यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या नाल्यांची ग्रामपंचायतीने लवकरात लवकर साफसफाई करण्याची नागरीकांनी मागणी केली आहे. दरम्यान गावात प्रवेश करणाऱ्या रस्त्यावरील नाली काही युवकांनी स्वतः श्रमदान करून काढली आहे. तसेच राडकर गल्लीतील रस्तावर जागोजागी खड्डे पडले आहेत. या रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी सातत्याने करण्यात येत आहे. याकडेही ग्रामपंचायत दुर्लक्ष करत आहे.

गावातील नागरीकांनी सरपंच अमोल घुंबरे, ग्रामविकास अधिकारी श्री गोरे यांना नाल्यांच्या साफसफाई करण्यासंदर्भात वेळोवेळी भेट घेऊन नाल्यांची साफसफाई करण्याची मागणी केली. पण त्यांनी याकडे दुर्लक्ष केले. लवकरात लवकर नाल्यांची साफसफाई नाही केल्यास पंचायत समिती समोर आंदोलन करण्याचा इशारा माजी सरपंच शरदराव राडकर व गावकऱ्यांनी दिला आहे.

## यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन येथे विद्यार्थ्यांचा निरोप

बीड । प्रतिनिधी

महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांन साठी निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. निरोप समारंभाची सुरुवात महाराष्ट्र गीताने करण्यात आली,यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बापूराव गहिनीनाथराव मरलापल्ले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतलेला विद्यार्थी हा कायमस्वरूपी महाविद्यालय सोबत जोडला गेलेला आहे. जरी आपण पास होऊन पुढील नोकरी किंवा उच्चशिक्षणासाठी गेलात तरी कधीही कोणत्या गोष्टीची गरज असेल तरी आम्ही सदैव आपल्या सोबत असणार आहोत तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये शिस्ती चे पालन करावे कारण औद्योगिक क्षेत्रात आपण गेल्या नंतर शिस्ती ला फार महत्व असते व यशस्वी



होण्यासाठी कायम प्रयत्नशील रहावे. जरी एखाद्या गोष्टीत अपयश आले तरी खचून न जाता प्रयत्न करत राहावे व नवीन तंत्रज्ञान अद्ययावत करत राहावे.यावेळी प्रा.मोमीन आय. एल यांनी ही आपले मनोगत व्यक्त केले.

अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना आठवणींना उजाळा देण्याची आणि त्यांचे अनुभव शेअर करण्याची ही संधी मिळाली त्यासोबतच प्रत्येक विभागात सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले.सदरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. प्रकाश (दादा) सोळंके साहेब, उपाध्यक्ष मा.श्री.अमरसिंह (भैय्यासाहेब) पंडित साहेब, सचिव मा.श्री.सतिश (भाऊ) चव्हाण साहेब, प्राचार्य.डॉ.बापूराव मरलापल्ले यांचे मार्गदर्शन लाभले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.सानिका पाटील, कु.राधिका यादव यांनी केले व आभार प्रदर्शन प्रा.राऊत डी.बी यांनी केले या कार्यक्रमासाठी सर्व विभागांचे विभागप्रमुख,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# प्रत्येक व्यक्तीने आपले ध्येय निश्चित केले पाहिजे-डॉ. तात्याराव लहाने

केज। प्रतिनिधी

स्पर्धेच्या युगामध्ये जीवन जगत असताना प्रत्येक व्यक्तीने ध्येयवादी बनले पाहिजे, तरच आपल्या संकल्पांची सहज प्राप्ती होईल. ज्यांनी आपल्या मनात आशा, विश्वास, प्रयत्न आणि डोळस श्रद्धा बाळगली असेल, अशी माणसंच आपल्या जीवनध्येयाची उंच शिखरं सहज गाठू शकतात. जीवनामध्ये अनेक स्वप्न बघा पण वाटचाल करत असताना टप्प्याटप्प्याने त्याची पूर्तता करा. यासाठी आपण कठोर परिश्रम, दृढ विश्वास आणि प्रबळ इच्छाशक्ती मनात बाळगली पाहिजे. संकल्पाला आत्मविश्वासाचा आणि समर्पण वृत्तीचा सहवास लाभला तर तो सिद्धीस जातो. आपल्या जीवनाची खरी सार्थकता आशावादी दृष्टिकोन बाळगून जगण्यात आहे. खरं तर आशावादी माणसं प्रयत्नवादी असतात. प्रत्येकाची इच्छाशक्ती ही प्रबळ असली पाहिजे, इच्छाशक्ती कमी असणे हे अपयशाचे लक्षण आहे, यासाठी सर्वकश ज्ञान आत्मसात करणे गरजेचे आहे. कारण मिरीट




चांगली असेल तर सन्मानही योग्य मिळतो. सध्या या तंत्रज्ञानाच्या युगामध्ये व्हाट्सअप, फेसबुक यांच्या वापर मर्यादित केला पाहिजे. अशी साधने आपल्या आरोग्यासाठी अत्यंत घातक ठरत आहेत. त्यामुळे केवळ डोळ्यांचेच नव्हे, तर इतरही आजार उद्भवत आहेत असे प्रतिपादन पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांनी केले.

केज येथील स्वामी विवेकानंद विद्या मंदिर या शाळेमध्ये दि. २० एप्रिल वार रविवार पासून स्व. विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यान मालेला नुकतीच सुरुवात झाली. यावर्षी या व्याख्यानमालेने २५ व्या वर्षात पदार्पण केले. तेंव्हा या व्याख्यानमालेचा शुभारंभ प्रमुख वक्ते पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने, सेवानिवृत्त वरिष्ठ अधिष्ठाता जे. जे. रुग्णालय, मुंबई यांच्या शुभहस्ते दिपप्रज्वलनाने झाला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा. लहू गळगुंडे, जिल्हा कोषागार अधिकारी बीड हे उपस्थित होते. इतर मान्यवर उपस्थितमध्ये सचिन देशपांडे, नायब तहसीलदार अंबेजोगाई, गोविंद अण्णा कद्रे, सामाजिक कार्यकर्ते बीड, नईमोद्दीन इनामदार, संस्थेचे माजी उपाध्यक्ष तसेच जीवन विकास शिक्षण मंडळ संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे, संस्थेचे सचिव जी. बी. गदळे, संस्थेचे संचालक नारायण अण्णा अंधारे, शाळेच्या मा. वि. च्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे, प्रा. वि. चे मु. अ. वसंतराव शितोळे, प्राचार्य शंकर भैरट, तसेच संस्थेचे सहसचिव तथा स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलचे मु. अ. गणेश कोकिळ आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व पाहुण्यांचा परिचय संस्थेचे सचिव जी. बी. गदळे यांनी दिला. याप्रसंगी ते म्हणाले, ही संस्था दरवर्षी विविध उपक्रम राबवते तसेच शिक्षकवृंद ही शाळेचा गुणात्मक आलेख टिकून ठेवण्यासाठी प्रयत्नशील असतात. पहिले पुष्प गुंफताना '' स्वप्न बघा स्वप्न जगा '' या विषयावर बोलताना डॉ. तात्याराव लहाने पुढे म्हणाले, जीवनामध्ये परिपक्व होण्यासाठी संस्कारक्षम शिक्षण घेतले पाहिजे. याप्रसंगी त्यांनी आपल्या जीवनातील काही आठवणींना उजाळा देण्याचा प्रयत्न केला ते म्हणाले, माझे शिक्षणही अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये झाले. जीवनामध्ये आईचे काय महत्व असते, ''आई म्हणजे समर्पण'' असे का म्हटले जाते हे त्यांनी उपस्थित श्रोत्यांना आपल्या आईच्या त्यागाबद्दल अत्यंत भावनिक होऊन सांगितले. या क्षेत्रामध्ये कार्य करत असताना बाबा आमटे यांच्याकडे जाऊन तेथील कुष्ठरोग्यावर उपचार केले, तसेच गडचिरोली, मेळघाट इथेही सेवा देण्याची संधी मिळाली. मागील जवळपास २६ वर्षात साडेचार लाख मोफत शस्त्रक्रिया केल्या. तसेच पन्नास लाख याचकांना दृष्टी देण्याचं अलौकिक कार्यही केले. सध्याच्या काळात विविध आजारांचा प्रादुर्भाव वाढत आहे, डायबिटीज विषयी सांगताना ते म्हणाले, जिभेवर नियंत्रण ठेवा, हृदयाला जपा व किमान तीन किलोमीटर नियमित चाला. कारण शरीर स्वास्थ्य हे निरोगी ठेवणं काळाची गरज आहे. अध्यक्षीय समारोपात लहू गळगुंडे म्हणाले, प्रबोधनासाठी अशी व्याख्याने आयोजित करणे अत्यावश्यक आहे. यातून जीवन जगण्याची योग्य दिशा मिळते. तसेच जीवनातील अनंत अडचणींना सामोरे जाण्याचे बळ ही मिळते. जीवन जगण्याच्या विविध पद्धती असतात, सुरुवातीच्या काळामध्ये शिक्षणासाठी गुरुकुल ही व्यवस्था होती, आता ही संकल्पना कुलगुरू पर्यंत आली. ध्येय म्हणजे जगणं होय. सध्याच्या काळामध्ये प्रचंड ज्ञानाचे भांडार उपलब्ध आहे. तेंव्हा प्रत्येकाला आपल्या आवडीनुसार करिअर घडविण्याची पूर्णपणे संधी आहे. तेंव्हा आपल्या ध्येयाला अनुसरून प्रत्येकाने वाटचाल करणे हे गरजेचे आहे. याप्रसंगी असंख्य श्रोत्यांनी उपस्थिती दर्शवली तसेच पत्रकार बंधूही मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे यांनी केले तर आभार रघुनाथ चौरे यांनी मानले.

cmyk

# कांद्यानं आणलं शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी

## दर घसरले, कांदा उत्पादक संघटनेची केंद्र सरकारकडे महत्त्वाची मागणी

देशात सर्वाधिक प्रमाणात कांदा उत्पादन करणाऱ्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सध्या प्रचंड आर्थिक फटका बसत असून, त्याचे मुख्य कारण कांद्याच्या दरात झालेली मोठी घसरण आहे. या पार्श्वभूमीवर कांदा उत्पादक शेतकरी संघटनेने केंद्र सरकार जबाबदार असल्याचा ठपका ठेवत निर्यात धोरणातील त्रुटींवर जोरदार टीका केली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा कांद्याच्या निर्यातीत मोठी घट झाल्याचे स्पष्ट झाले आहे. सध्या देशातून फक्त ७ ते ८ टक्के कांद्याची निर्यात होत असून, यामुळे देशांतर्गत बाजारपेठेत कांद्याचा साठा वाढत आहे आणि परिणामी दर कोसळत आहेत. या घसरणीचा मोठा आर्थिक फटका थेट शेतकऱ्यांना बसत आहे, असं कांदा उत्पादक संघटनेचं म्हणणं आहे.

कांदा उत्पादक संघटनेचे राज्य अध्यक्ष भारत दिघोळे यांनी याबाबत म्हटले आहे की, देशातून वीस ते पंचवीस टक्के कांदा निर्यात होण्यासाठी केंद्र सरकारने पाऊल उचलावी. निर्यात शुल्क लावल्याने कांद्याच्या दरात होणारी पडझड यावर



वाणिज्य मंत्रालयाकडून शेतकऱ्यांच्या कांद्याला भाव मिळावा, यासाठी विशिष्ट धोरण तयार करावे. सध्या सात ते आठ टक्के कांदा निर्यात होत असताना वीस ते पंचवीस टक्क्यांपर्यंत कांदा परदेशात निर्यात कसा होईल? यासाठी केंद्राने तात्काळ निर्णय घ्यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी सोमवारी लासलगाव बाजार समितीला भेट दिली, यावेळी त्यांनी शेतकरी, व्यापारी आणि संघटनेचे कार्यकर्त्यांशी चर्चा केली. केंद्र सरकारने वेळेवर निर्यात शुल्क रद्द केलं असतं, तर कांद्याचे बाजारभाव दोन हजार रुपयांच्या पुढे गेले असते. पण सरकारच्या वेळकाढूपणामुळे कांद्याचे दर कोसळले आणि त्याचा थेट फटका शेतकऱ्यांना बसला आहे, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. यंदा महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशात कांद्याचे उत्पादन वाढले असल्याची माहिती सरकारकडे दोन-तीन महिन्यांपूर्वीपासून उपलब्ध होती. बाजारपेठ ही भावनेवर नव्हे, तर मागणी आणि पुरवठ्यावर चालते. जर पुरवठा अधिक असेल, तर त्याचे नियोजन करणं हे सरकारचं कर्तव्य आहे. पण डेटा असूनही नियोजन होत नसल्याने नुकसान शेतकऱ्यांना सोसावं लागतंय, अशी टीकादेखील राजू शेट्टी यांनी केली. तर शेतमालाला हमीभाव मिळावा, यासाठी कायदा सरकारच्या मानगुटीवर बसून मंजूर करावा लागेल आणि त्यासाठी आम्ही लढा देणारच, असेही राजू शेट्टी यांनी म्हटले.

## वेलवर्गीय भाजीपाला पिकांसाठी मंडप उभारणीची पद्धत



शेतावर वेलवर्गीय भाजीपाला पिकांना योग्य आधार देण्यासाठी मंडप उभारणे एक उत्तम उपाय आहे. मंडप वेलवर्गीय पिकांना हवामानातील बदल, जास्त पाऊस, किंवा मजबूत वाऱ्यापासून संरक्षण देतो आणि त्यांना वाढण्यासाठी एक मजबूत आधार प्रदान करतो.

लाकडी डांबांची तयारी : शेताच्या सर्व बाजूंनी प्रत्येक ५ ते ६ फूट अंतरावर १० फूट उंच आणि ४० जाड लाकडी डांब (पोल) जमिनीत गाडावेत. डांब २ फूट जमीन गाडून उभे करावेत. हे पिकांना योग्य आधार देतात आणि हवामानातील बदलांपासून त्यांचे संरक्षण करतात.

तारे ताणणे : त्यानंतर, डांबाच्या बाहेरील बाजूस ताणण्यासाठी ८ गेज तारा वापरणे आवश्यक आहे. तारांना १-९.५ फूट लांबीच्या दगडांवर दुहेरी बांधून जमिनीत गाडा. हे तार मजबूतीने ताणले जातात आणि पिकांना अधिक स्थिरता मिळते.

यू आकाराचे खिळे ठोकणे : तारे घसरू नयेत यासाठी, डांबावर यू आकाराचे खिळे ठोकून तारा पक्की करावी. यामुळे तार ताणलेल्या स्थितीत राहतील आणि पिकांच्या संरक्षणासाठी अधिक सुरक्षित असतील.

पिळाची तारे ताणणे : त्यानंतर, १६ गेज तारे प्रत्येक २ फूट अंतरावर ताणलेल्या तारेवर पसराव्यात. यामुळे मंडप अधिक मजबूत होईल आणि वेलवर्गीय पिकांना सुरक्षा मिळेल.

वेलवर्गीय पिकांसाठी मंडप उभारण्याचे फायदे : हवामानाचे संरक्षण - मंडप पिकांना जास्त पावसापासून, उन्हाच्या तीव्रतेपासून आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवतो.

उत्पादन वाढवणे - मंडपामुळे पिकांना अधिक स्थिरता मिळते आणि त्यांना योग्य वातावरण मिळवून उत्पादन वाढते. आधार मिळवण - पिकांना ताणलेले तारे योग्य आधार देतात, ज्यामुळे वाऱ्याने किंवा इतर कारणांमुळे पिकांचे नुकसान होणार नाही. जलद स्थापना - मंडप उभारणीची प्रक्रिया साधी आणि जलद आहे. पिकांसाठी योग्य संरचना तयार होण्यास वेळ लागत नाही. वेलवर्गीय भाजीपाला पिकांसाठी मंडप उभारणे हे एक खूप प्रभावी उपाय आहे. योग्य पद्धतीने उभारलेला मंडप पिकांना हवामानाची प्रतिकूल परिस्थिती टाळण्यासाठी आणि त्यांचा विकास योग्य प्रकारे होण्यासाठी खूप मदत करतो. म्हणूनच, आपल्या शेतावर मंडप उभारून आपल्या पिकांना सुरक्षा आणि वाढ देणे एक उत्तम पर्याय आहे. आपल्या शेतात मंडप उभारण्यासाठी आजच पद्धत वापरा आणि आपल्या पिकांसाठी सुरक्षित वातावरण तयार करा.

## भूजल पातळी वाढविणाऱ्या पाझर तलावाचे नियोजन

पाणलोटक्षेत्रात वाहून जाणारे पाणी अडविले जाऊन शेतीकरिता व त्या क्षेत्रातील भूजल पुनर्भरणाकरिता त्याचा वापर होऊ शकतो. तांत्रिक दृष्टिकोनातून पाझर तलावांचे नियोजन करताना काही गोष्टी महत्वाच्या असतात. पाझर तलाव म्हणजे नैसर्गिक नाला किंवा ओढ्यावर आडवा बांधलेला आणि पाणलोटक्षेत्रातून गोळा होणारा प्रवाह अडवून तो जास्तीत जास्त दिवस साठवून, तो जमिनीत मुरवून त्या क्षेत्रातून भूजलाची पातळी वेगाने वाढविणाऱ्या बंधाऱ्यामुळे तयार होणारा जलाशय.

पाझर तलावामुळे पाण्याबरोबर वाहून जाणारी सुपीक मातीदेखील अडविली जाते. जमिनीतील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी दुष्काळी प्रदेशात पाझर तलावाचे बांधकाम करतात. पाझर तलावाचे बांधकाम करताना अशा पद्धतीने करावे की, पावसाळ्यात तलाव संपूर्ण भरावा आणि हिवाळ्यापर्यंत सर्व पाणी पाझरून/ मुरून आजूबाजूच्या विहिरीच्या पाण्याच्या पातळीत वाढ होते. ज्या ठिकाणी पाझर तलावाचे बांधकाम असते, त्या ठिकाणी जमिनीचा थर पाझरास योग्य असावा लागतो. पाझर तलावाचे मुख्य कार्य म्हणजे त्यामध्ये साठविलेले पाणी जमिनीत मुरवून भूजल पातळी वाढविणे. पाझर तलाव हा सच्छिद्र भूभागावर बांधला, तरच त्याचे फायदे मिळू शकतात. म्हणून पाझर तलाव हा एखाद्या भारी अथवा अभेद्य जमिनीवर बांधू नये, की ज्यामुळे पाझर तलावाच्या मुख्य कार्याला बाधा होईल.

जमिनीचा निवड : पाझर तलाव अशा ठिकाणी बांधावा, की तेथील जमिनीचा वरचा थर सच्छिद्र असेल आणि त्याखालच्या कमीत कमी तीन मीटर जाडीचा थर हा जास्तीत जास्त झिजलेला असेल. अशा प्रकारच्या जमिनीवर बांधलेल्या तलावामुळे भूजल पुनर्भरणाचा वेग वाढतो. पाझर तलावाच्या खालच्या बाजूला अथवा परिणाम क्षेत्रात पिकायोग्य जमीन मोठ्या प्रमाणात असणे आवश्यक आहे. अशी मोठ्या प्रमाणातील शेतजमीन असल्याने पाझर तलावाचा जास्तीत जास्त उपयोग करून शक्य होते. त्याचप्रमाणे या भागात अनेक विहिरी असणे किंवा नवीन विहिरी खोदण्यालायक क्षेत्र असणे गरजेचे आहे, की जेणेकरून त्या भागाला सिंचनाखाली आणणे सहजशक्य होईल. लहानात लहान पाझर तलावाच्या क्षेत्राची लांबी एक किमी असते. तलाव एखाद्या खोल दरीसारख्या भागात बांधावा : पाझर तलावामध्ये जास्त होणारे पाणी काढून टाकण्यासाठी सांडव्याची साधी, आर्थिकदृष्ट्या परवडणारी आणि कार्यक्षम व्यवस्था करता येणे भौगोलिकदृष्ट्या शक्य व्हावयास हवे. पुरेशा सच्छिद्र भूस्तरावर पाझर तलाव बांधताना तो एखाद्या खोल दरीसारख्या भागात बांधावा, जेणेकरून खोल तळे तयार होईल. पाणी कमीत कमी क्षेत्रावर पसरेल. उथळ तळ्यापेक्षा असे खोल तळे तयार केल्याचे दोन फायदे आहेत. एक म्हणजे ऊन-वाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणात होणारे पाण्याचे बाष्पीभवनाचे प्रमाण कमी होते.कमीत कमी जमीन पाण्याखाली बुडते. दुसरा फायदा म्हणजे तलावातील पाणी अडविण्याकरिता निवडलेले क्षेत्र जर पुरेसे सच्छिद्र नसेल तर त्याचे साठवण क्षेत्र वाढवावे, ज्यायोगे अधिक पाणी जमिनीत मुरू शकेल.

मृद्संधारणाची कामे : ज्या पाणलोटक्षेत्रामधून पाझर तलावामध्ये पाणी येणार आहे, त्यात योग्य प्रमाणात झाडेझुडपे व गवत असावे, की ज्यामुळे मातीची धूप होणार नाही. जर अशा प्रकारची व्यवस्था नसेल, तर त्या पाणलोटक्षेत्रात मृद्संधारणाची कामे हाती घ्यावीत; अन्यथा ती वाहून आलेली माती पाझर तलावात साठून त्याची साठवणक्षमता कमी होऊ शकते. पाझर तलावाचा भराव तयार करण्याकरिता योग्य प्रकारची माती इतर बांधकाम साहित्य त्या क्षेत्रातच उपलब्ध होणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे आहे. बाहेरून साहित्य वाहून आणून भराव तयार करण्यामुळे खर्चात अनावश्यक वाढ होऊ शकते.



## दिन विशेष

### जागतिक दिवस

जागतिक ग्रंथ तथा रचनास्वायत्त दिन

### महत्वाच्या घटना

१६३५ : अमेरिकेतील पहिली सार्वजनिक शाळा बोस्टन लॅटिन स्कूल स्थापन झाली.
१७७४ : ब्रिटीश कमांडर कर्नल चेम्पमेन यांनी रोहिलखंड येथील रोहिला सेनेचा पराभव करून रोहिलखंड आपल्या ताब्यात घेतले.
१८१८ : दोनशे युरोपियन व दोनशे एतद्देशीय शिपायांसह इंग्रज अधिकारी मेजर हॉल यास कर्नल प्रॉयर याने रायगड किल्ल्याची टेहळणी करण्यास पाठविले. चैत्र व. ३
१८९१ : रुस देशाची राजधानी मास्को येथिल यहुदी धार्मिक लोकांना देशाबाहेर काढून देण्यात आले.
१९३५ : युरोपियन राष्ट्र पोल्लंड ने संविधान आमलात आणले.
१९८४ : वैज्ञानिकांनी एड्स या विषाणूचा शोध लावला.
१९९० : नामिबिया संयुक्त राष्ट्रांत प्रवेश होऊन तो १६० वा सदस्य देश बनला.


### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५६४ : विल्यम शेक्सपियर, इंग्लिश साहित्यिक.
१५६४ : विल्यम शेक्सपिअर - इंग्लिश नाटककार आणि अभिनेता. युनेस्कोने घेतलेल्या पुढाकारामुळे विल्यम शेक्सपिअर यांच्या सन्मानार्थ १९९५ पासून आजचा दिवस हा 'जागतिक पुस्तक दिन' म्हणून साजरा केला जातो. (मृत्यू: २३ एप्रिल १६१६)
१७९१ : जेम्स बुकॅनन - अमेरिकेचे १५ वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: १ जून १८६८)
१८५८ : मॅक्स प्लँक - नोबेल पारितोषिक विजेते जर्मन भौतिक शास्त्रज्ञ (मृत्यू: ४ आक्टोबर १९४७)
१८५८ : पंडिता रमाबाई - विधवा, परिक्त्यक्ता आणि स्त्रियांच्या सर्वांगीण उद्धारासाठी कार्य करणाऱ्या समाजसुधारक आणि 'आर्य महिला समाज' च्या संस्थापिका, संस्कृत पंडित (मृत्यू: ५ एप्रिल १९२२)
१८७३ : महर्षि विठ्ठल रामजी शिंदे - अस्पृश्यता निवारण हे जीवनध्येय मानलेले व्यासंगी समाजसुधारक (मृत्यू: २ जानेवारी १९४४)
१८९७ : लेस्टर बी. पिअर्सन = कॅनडाचे १४ वे पंतप्रधान आणि नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: २७ डिसेंबर १९७२)
१९२७ : हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या गायिका व सर्बहार वादक अन्नपूर्णा देवी यांचा जन्मदिन.
१९३८ : एस. जानकी - शास्त्रीय गायिका
२००५ : मी अ‍ॅट द झू हा पहिला व्हिडिओ युट्यूब वर प्रकाशित झाला.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६१६ : विल्यम शेक्सपिअर  इंग्लिश नाटककार आणि अभिनेता. युनेस्कोने घेतलेल्या पुढाकारामुळे विल्यम शेक्सपिअर यांच्या सन्मानार्थ
१९९५ : पासून आजचा दिवस हा 'जागतिक पुस्तक दिन' म्हणून साजरा केला जातो. (जन्म: २३ एप्रिल १५६४)
१८५० : विल्यम वर्डस्वर्थ - काव्यातील स्वच्छंदतावादाचे प्रणेते इंग्लिश कवी. त्यांची 'डॅफोडिल्स' ही अतिशय गाजलेली कविता आहे. (जन्म: ७ एप्रिल १७७०)
१९२६ : हेन्री बी. गुप्पी - ब्रिटिश वनस्पतीशास्त्रज्ञ (जन्म: २३ डिसेंबर १८५४)
१९५८ : शंकर श्रीकृष्ण देव - निष्ठावान समर्थभक्त, समर्थ वाङ्मयाचे आणि संप्रदायाचे अभ्यासक व प्रकाशक (जन्म: १० आक्टोबर १८७१)
१९६८ : संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय पटियाला घराण्यातील हिंदुस्थानी शास्त्रीय गायक उस्ताद बडे गुलाम अली खान यांचे निधन.
१९७३ : हिंदी आणि ब्रजभाषेतील प्रख्यात कवी आणि लेखक धीरेंद्र वर्मा याचं निधन.
१९९२ : सत्यजित रे  - ख्यातनाम चित्रपट निर्माते व दिग्दर्शक आणि भारतरत्न. 'पथेर पांचाली' या त्यांच्या पहिल्याच चित्रपटाला देशविदेशात अनेक गौरव मिळाले. त्यांना विशेष ऑस्कर पुरस्कारही देण्यात आला होता. (जन्म: २ मे १९२१)
२००० : मराठी चित्रपटांना आधार मिळावा या ध्येयाने प्रेरित होऊन गेली ४० वर्षे लालबागमधील 'भारतमाता' चित्रपटगृह चालवणारे यशवंत सदाशिव ऊर्फ बाबासाहेब भोपटकर यांचे निधन.
२००१ : जयंत श्रीधर तथा जयंतराव टिळक - संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे एक नेते, गोवा मुक्ती संग्रामातील एक झुंजार सेनापती, लोकमान्य टिळकांचे नातू, राजकारण, समाजकारण, साहित्य, पत्रकारिता, तत्त्वज्ञान, विज्ञान, निसर्ग आणि शिकार इ. विविध क्षेत्रांमधे दीर्घकाळ सक्रिय असणारे महाराष्ट्र विधान परिषदेचे अध्यक्ष व केसरीचे संपादक (जन्म: १२ आक्टोबर १९२१)
२०१३ : शमशाद बेगम - पार्श्वगायिका (जन्म: १४ एप्रिल १९१९).

## काळ्या मक्याच्या लागवडीतून मिळेल अधिक उत्पन्न



मका शेती ही अनेक कारणांमुळे शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरत आहे. मक्याच्या पांढऱ्या आणि लाल जातींव्यतिरिक्त पांढरे कॉर्न आणि स्वीट कॉर्नच्या लागवडीबाबत शेतकऱ्यांची आवड सातत्याने वाढत आहे. तसेच उन्हाळी हंगामातील पेरणीसाठी शेतकऱ्यांकडून काळ्या मक्याच्या लागवडीला प्राधान्य दिले जात आहे. देशातील महानगरांमध्ये २०० रुपये प्रति नग या दराने काळा मका विकला जातो. बहुतेक शेतकऱ्यांना काळ्या मक्याच्या लागवडीबद्दल माहिती नाही. तर जाणून घेऊ या  काळ्या मक्याची लागवड पद्धती, आणि त्यातून मिळणारा नफा याबद्दल सविस्तर.

काळ्या मक्याची जात : देशात प्रथमच, छिंदवाडा येथील कृषी संशोधन केंद्राने काळ्या मक्याच्या लागवडीवर संशोधन केले आणि मक्याची नवीन जात 'जवाहर मका १०१४' (१०१४) विकसित केली. कृषी शास्त्रज्ञ आता या जातीची लागवड करण्याची शिफारस करतात. मक्याची ही जात त्यातील पोषक घटकांमुळे कुपोषणाशी लढण्यासाठी प्रभावी ठरेल. या मक्याचा वापर अनेक आरोग्यदायी उत्पादनांमध्ये शक्य होणार आहे. मक्याची ही जात खोड रोगास तग धरणारी आहे. हा वाण पावसावर आधारित पठारी क्षेत्रासाठी अधिक उपयुक्त आहे.

काळ्या मक्याची वैशिष्ट्ये :काळ्या मक्याची 'जवाहर मका १०१४' ही जात ९० ते ९५ दिवसात तयार होते. मक्याची ही जात कुपोषणाशी लढण्यासाठी प्रभावी आहे. त्यात लोह, तांबे आणि जस्त मोठ्या प्रमाणात आढळतात. मक्याची ही पहिली जात आहे जी पौष्टिक आणि जैव-फोर्टिफाइड आहे. मक्याचा हा प्रकार बाजारात महागड्या दरात उपलब्ध आहे. एक मका २०० रुपयांना ऑनलाइन विकला जात आहे. त्याची किंमत नेहमी सामान्य मक्यापेक्षा जास्त असते, कारण फार कमी शेतकरी या जातीची लागवड करतात. काळा मका त्याच्या चवीमुळे आणि अधिक पौष्टिक गुणधर्मांमुळे हळूहळू लोकप्रिय होत आहे. काळ्या मक्याचे दाणे शिजायला जास्त वेळ लागतो. पिकल्यानंतर त्याचे दाणे काळे, चमकदार आणि आकर्षक दिसतात. काळ्या मक्याचे दाणे पिवळ्या आणि पांढऱ्या मक्यापेक्षा जास्त चवदार आणि गोड असतात.

काळ्या मक्याचे उत्पादन : काळ्या मका पिकाला चांगल्या वाढीसाठी उष्ण हवामानाची गरज असते.

लागवड ओळींमध्ये केली जाते आणि ओळीत रोपापासून रोपापर्यंतचे अंतर ६० ते ७५ सें.मी ठेवावे. रोपावस्थेत या पिकाला जास्त पाणी द्यावे लागते.एक एकर जमिनीत ८ किलो बियाण्यापासून शेतकरी २६ क्विंटलपर्यंत उत्पादन मिळू शकते. कूणच, काळा कॉर्न केवळ चवदारच नाही तर भरपूर पोषक देखील आहे, ज्याचा वापर आरोग्याच्या दृष्टिकोनातून खूप फायदेशीर आहे. आत्तापर्यंत आपल्या देशात शेतकरी पांढरा आणि पिवळा मका घेतात, पण काळा मका पिकवण्याकडेही शेतकऱ्यांचा कल वाढत आहे.

# तीस वर्षापूर्वी विखूरलेली पाखरे जमा झाली नाथांच्या उद्यानात

## एकनाथ महाराजांच्या जीवनातील आदर्श घेऊन पुढील आयुष्य जगा–योगेश महाराज गोसावी





शिरूर। प्रतिनिधी

शाळा व महाविद्यालयीन जीवनामध्ये विद्यार्थी म्हणून आयुष्याला आकार देण्यासाठी एकवटलेले निरागस जीव आयुष्याच्या पुढील लढाईमध्ये वेगवेगळ्या मार्गाने विभक्त होत असतात एक दोघांच्या भेटी सोडल्या तर एकत्र शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा भेटणे अशक्य असते परंतु गेट–टुगेदर च्या नावाने सध्या एकत्र येण्याची पद्धत रूढ होताना दिसून येत आहे असाच एक १९९५ मध्ये कालिकादेवी महाविद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांनी शांतिब्रह्म एकनाथ महाराज यांच्या पैठण नगरीमध्ये सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांच्या पुढाकारातुन गेट–टुगेदरचा सोहळा घडवून आणला.

कालिकादेवी माध्य.व उच्च माध्य.विद्यालयात १९९५ साली इयत्ता १० वी मध्ये शिक्षण घेणारी बॅच पुढील शिक्षणासाठी वेगवेगळ्या ठिकाणी स्थलांतरित झाली यानंतर या बॅचमधील विद्यार्थ्यांच्या पुन्हा एकत्र भेटी झाल्या नसल्याने यातील काही विद्यार्थ्यांनी या बॅचमधील सर्व वर्गमित्रांना एकवटण्यासाठी दिनांक १९ रोजी शांतीब्रह्म एकनाथ महाराज यांच्या पैठण नगरीमध्ये हॉटेल दुर्गा गार्डन या ठिकाणी गेट–टुगेदर चे आयोजन करण्यात आले.

या अनुषंगाने १९९५ मध्ये शिकणारे सर्व विद्यार्थी या ठिकाणी तब्बल ३० वर्षानंतर एकत्र आले यावेळी शांतीब्रम्ह संत एकनाथ महाराज यांचे वंशज ह.भ.प योगेश महाराज गोसावी यांच्या हस्ते या सोहळ्याचे दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले यावेळी एकवटलेल्या सर्व माजी विद्यार्थ्यांना शांती ब्रह्म एकनाथ महाराज यांच्या जीवनातील आदर्श घेऊन पुढील आयुष्यात शांततेच्या व स्थैर्याच्या मार्गाने जीवन जगावे यासोबतच एकनाथ महाराजांचे आशीर्वाद कायम तुमच्या पाठीशी राहतील असे सांगत ह.भ.प योगेश महाराज गोसावी यांनी एकत्रित जमलेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या गेट–टुगेदर मध्ये जमलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देऊन प्रत्येकाच्या आयुष्यात सुखदुःखाच्या गोष्टी यावेळी वाटून घेतल्या. यावेळी ह.भ.प.योगेश महाराज गोसावी,सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी,इंजि.संतोष गर्जे यांचेसह अशोक खोले,प्रकाश काशिद,डिगांबर तावरे,हानुमान काकडे,बबन सप्रे,आजिनाथ मैंदड,नवनाथ वीर,लहू व्हरकटे,शिवाजी व्हरकटे,रामनाथ जाधव,जयश्री वाघमारे,मनिषा चव्हाण,हारीभाऊ कवादे,सविता ऊटे,आण्णासाहेब वाघुंब्रे,सुलभा खोले,रामनाथ बडे,नवनाथ पानखडे,मंदा खोले,अमिना शेख,सविता गिरी,बद्रीनाथ पवार,कल्याण पाखरे,गोरक्ष कांबळे,अर्जुन भोसले,लक्ष्मी चांदणे,संगिता लाटे,सर्जेराव गहिनाथ खोले,कचरू कातखडे,कल्पना भुजबळ,गणेश कवादे,पंडीत तांबे,चंद्रकला तळेकर,संदीपान कातखडे,महादेव तांबे,दत्तु काकडे,भाऊसाहेब काकडे,छाया काकडे,सर्जेराव नारायण खोले,सय्यद दस्तगीर,सुनिता घोडके,बाळु गर्कळ आदीसह ५० वर्गमित्र यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाच प्रास्ताविक व सुत्रसंचलन सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांनी केले तर आभार इंजि.संतोष गर्जे यांनी मानले

## राजेभाऊ फड यांच्या पाठपुराव्याला यश! कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश




परळी। प्रतिनिधी

उन्हामुळे निर्माण झालेली उष्णता आणि त्यामुळे निर्माण झालेली पाणीटंचाई लक्षात घेता कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडण्यात यावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी प्रशासनाकडे करून त्यासंदर्भात मोठी लढाई उभारण्याचा इशारा दिला होता. यासंदर्भात जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची भेट घेऊन ग्रामस्थांना सोबत घेऊन रास्तारोको आंदोलन करणार असल्याचेही त्यांनी कळवले होते. याचीच दखल घेऊन आज मंगळवार दिनांक २२ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी यांनी प्रशासनाला तत्काळ पाणी सोडण्याचे आदेश दिले आहेत.

कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडण्यात यावे अशी मागणी मागील एक महिन्यापासून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्यासह ग्रामस्थांकडून करण्यात येत होती. पाणी न सोडल्यास कन्हेरवाडी येथे परळी – अंबाजोगाई महामार्गावर रास्तारोको आंदोलन करण्याचा इशारा दिल्याने अखेर प्रशासनाला मागणी मान्य करावी लागली असून, जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी यासंदर्भात अध्यादेश काढून पाणी सोडण्याचे आदेश निर्गमित केले आहेत. या प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडण्यात येणार असल्यामुळे कन्हेरवाडी गावासह आजूबाजूला असलेले जिरेवाडी, जलालपूर, शंकर – पार्वती नगर, बँक कॉलनी आदी भागातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागला असून जनावरांच्याही पाण्याची सोय झाली आहे. कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडण्यासाठी राजेभाऊ फड यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा केल्यामुळेच या मागणीला यश आल्यामुळे नागरिकांच्या वतीने त्यांचे आभार मानले जात आहेत.

# पाटोदा.एस टी महामंडळाची पार्सल सेवा बंद



पाटोदा। प्रतिनिधी

सरकारच्या खाजगीकरणाचा फटका आता शेतकऱ्यांना थेट बसू लागला आहे एसटी पार्सल व्यवस्थेचे खाजगीकरण झाले आहे. पाठवल्याची पार्सल व्यवस्था बंद आहे महासांगवी परिसरातील फुल शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना खाजगीकरणाचा पहिला फटका बसला आहे मागील दीड महिन्यापासून पार्सल व्यवस्था बंद असल्याने शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे सरकार शेतकऱ्यांना शेतीमध्ये वेगळे प्रयोग करण्यासाठी मला चांदीत आहे कृषी विभागाच्या माध्यमातून फ्रॉक छान देताना काही शेतकरी स्वखर्चाने नवनवीन प्रयोग करत आहेत पारंपारिक शेतीला पर्याय म्हणून पोलीस शेती शेळी पालन कुक्कुटपालनाची नवीन प्रयोग केले जात आहेत तालुक्यातील महासंघवाडी पारनेरवाडी नबरवाडी दासखेड आणि भागातील शेतकरी फुल शेतकरी वळले आहे. काही गावात गट निर्माण झाले असून शेतीच्या माध्यमातून निघणारी फुलकल कल्याण नगरला पाठवले जातात गोडवाडी येथील शेतकरी सुरेश भागुजी नागरगोजे यांची .गेल्या पंधरा वर्षापासून फुल शेती आहे नागरगोजे इतरच्या शेतकऱ्यांना म** घेऊन बीडला एसटी पार्सलने पाठवतात गेल्या दीड महिन्यापासून पाठवून देतील एसटी पार्सल व्यवस्था बंद आहे त्यामुळे नागरगोजे यांना फुल पाठवण्यास अडचणी निर्माण होत आहेत नागरगोजे यांनी तहसीलदाराकडे तक्रार मांडण्याचा प्रयत्न केला मात्र तहसीलदार दौऱ्यावर होते तर अगर प्रमुखांनी पार्सल व्यवस्था खाजगी कंपनीचे असल्याने आम्हाला हस्तक्षेप करता येत नसल्याने सांगितले. त्यामुळे नागरगोजे स्वतः दुचाकीवरून बीडला पोहोचवत आहेत त्यामुळे खर्च वाढला असून फुल शेती. अवघड विषय झाला आहे. खाजगी कंपनीच्या मनमानीचा फटका शेतकऱ्यांना बसू लागला आहे.

### पाटोदा आगार प्रमुखांकडून कर्मचाऱ्यास त्रास

पाटोदा आगार राची आगाराची बस. पाटोदा येथून शिरूर कडे जाताना. दुपटवाडी जरेवाडीच्या जवळ. एसटीचा ब्रेक फेल . झाला असता. १४..२२७३.बस ड्रायव्हर.शंकर सुभाष यांनी.प्रसंगावधान दाखवून. यावेळी. ड्रायव्हरने. पाच महिला हापसा.पाणी घेऊन येत असताना. बस समोर अचानक ड्रायव्हरने प्रसंगावधान दाखवून. बस शेतामध्ये दाबली. व पाच महिलांचे.जनावरांचे प्राण वाचवले. बस ड्रायव्हरचे कौतुक गावच्या सरपंचांनी केले. रिकामी झालेली बस गावचे सरपंचांनी स्वखर्चाने एसटी डेपोला केली. घटनास्थळी. आधार प्रमुख खेडकर. एसटीचे उपकार्यशाळा अध्यक्ष. शिंदे. व मेकॅनिक सोबत घेऊन घटनास्थळी पाहणी केली. व टोचन करून बस आग्रार मध्ये आणली.वापस आणली. बच्चे नुकसान पाचशे रुपये असताना. डेपो मॅनेजर खेडकर. यांनी ड्रायव्हरचा कौतुक करायचं सोडून उलट ड्रायव्हरला. चें नावे एसटी बस चे नुकसान पाचशे रुपये असताना.दहा हजार रुपये दाखवले.

# विश्वासाने राम नामस्मरण केले की सुख पद मिळते –दिगंबर महाराज गिरी

बीड । प्रतिनिधी

विश्वास या शब्दासच भाव, श्रद्धा असेही म्हणतात. असे रामनाम स्मरण व्यक्तीकडून घडले तर परमात्म्याच्या सुखाचा त्यास आनंद निश्चित मिळतो म्हणूनच विश्वासाने रामनाम स्मरण केल्यास सुख हे पद मिळते असे प्रतिपादन ह भ प दिगंबर महाराज गिरी उत्तरेश्वर पिंपरीकर यांनी विठ्ठल मंदिर ,अंबिका नगर, पांगरी रोड बीड येथे केले. बीड येथील विठ्ठल मंदिर अंबिका नगर पांगरी रोड येथे विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या विसाव्या वर्धापन दिनानिमित्त विसाव्या शतकातील महान संत हरिभक्त परायण सद्गुरु ज्ञानेश्वर माऊली दादा यांच्या कृपाशीर्वादाने व तपो निधी हभप नारायण महाराज श्री संत माऊली महाराज संस्थान उत्तरेश्वर पिंपरीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व शुभ हस्ते सुरू असलेल्या अखंड हरिनाम




सप्ताहात प्रारंभिक कीर्तनात राम म्हणता रामच होईजे/पदी बैसोनी पदवी घेईजे//१//या संत तुकाराम महाराज यांच्या चार चरणी अभंगातून हरिभक्तिपरायण दिगंबर महाराज उत्तरेश्वर पिंपरीकर, श्री ज्ञानेश्वर माऊली दादा चाकरवाडीकर यांचे नातू नामस्मरणाचे महत्त्व सांगतात.

आपल्या अभंग निरूपणातून बोलताना हरिभक्तिपरायण दिगंबर महाराज म्हणाले की ,या मृत्यू लोकात आल्यावर आपणास सुख हवे आहे, त्यासाठी आपण राम नामस्मरण करूनच त्याचे फळ सुख मिळवीत असतो. रामनाम हे कोणीही, केव्हाही, कुठेही घ्यावे. रामनाम स्मरणाचा परिणाम वाल्याचा वाल्मीक ऋषी झाला. त्यांनी राम जन्माअगोदरच रामाचे संपूर्ण चरित्र लिहीले.

कोणतेही काम करतांनाआपण राम म्हटले तर आपले शरीर धन्य होईल. जीवनात मिळणाऱ्या पदव्या ह्या कष्टाने मिळवाव्या लागतात. जगातले आपले पद हे कोणालाही देता येत नाहीत पण राम हे पद नाम घेणारास मिळते त्यापासून मिळणारे पद सुख आहे सुख हे पद नाशवंत नाही इतर पदांमध्ये मात्र नाश आहे. रामापासून मिळणाऱ्या पदार्थास नाश नाही .चिरकाल टिकणारेआहे.

विश्वास हे परमार्थातील श्रेष्ठ भांडवल आहे जगात काही वर विश्वास ठेवावा लागतो. त्यात बसचा ड्रायव्हर, जेवण बनविणारा, नाभिक, पण नदीचेपाणी, नखाचे प्राणी, शिंगाचे प्राणी, शस्त्र बाळगणारा व्यक्ती, स्त्री, राजकुल यावर विश्वास ठेवू नये नाहीतर ते कधी घात करतील हे सांगता येत नाही आपल्या हितासाठी आपणास नाम व संतावर विश्वास ठेवावाच लागतो. जगात राम रस सर्वश्रेष्ठ रस आहे व त्यात प्रेम मिसळले तर अष्ट सात्विक भाव मिळतात इतर संसारी रस हे तुच्छ वाटतात संतांनी हा ब्रह्म रस काढा घेतला आहे व तो सर्वांनी घ्यावा अशी त्यांची अपेक्षा आहे. सर्व मंत्रापेक्षा अतिशय सोपा व सर्वश्रेष्ठ मंत्र राम आहे या मंत्रास अपार महत्व आहे म्हणूनच भजनात राम कृष्ण हरी हा मंत्र घेतला आहे मनुष्याच्या मुखात सतत हा मंत्र यावा. यावेळी हरिभक्त परायण नारायण महाराज गिरी (भागवताचार्य ) रामहरी रसाळ गुरुजी, विभागीय प्रवक्ता अखिल भारतीय वारकरी मंडळ, श्री अनंत घीगे साहेब पत्रकार दैनिक रिपोर्टर, सुनील लांडगे, दिलीप वखरे, विठ्ठल गायके ,अजय सारंगकर गुरुजी ,रामचंद्र कागदे गुरुजी, गायक म्हणून ह भ प चिंतामण महाराज मोरे ,नवनाथ महाराज नाईकवाडे ,अंगद महाराज सातपुते ,उमाशंकर महाराज शिंदे, मृदंग वादक: यश महाराज तर असंख्य भाविक भक्त उपस्थित होते.

# कर्मयोगी आबासाहेब'' चित्रपटाला ''दादासाहेब फाळके पुरस्कार''

## लेखक,दिग्दर्शक अल्ताफ दादासाहेब शेख यांच्या शिरपेचात मानाचा तुरा

बीड। प्रतिनिधी

जिल्ह्याचे जावई सोलापूरचे भूमिपुत्र गेल्या काही वर्षापासून पुणे येथे स्थायिक झालेले अल्ताफ दादासाहेब शेख यांनी लेखन व दिग्दर्शन केलेला शेतकरी कामगार पक्षाचे नेते, आमदार, माजी मंत्री दिवंगत गणपतराव उर्फ आबासाहेब देशमुख यांच्या आयुष्यावर आधारित कर्मयोगी आबासाहेब या चित्रपटाला चित्रपटसृष्टीतील सर्वात महत्त्वाचा आणि मानाचा असा दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाल्याने त्यांच्या शिरपेचात अजून एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

यामुळे हिंदी–मराठी चित्रपट सृष्टीतून अभिनंदन होत असून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. अल्ताफ दादासाहेब शेख




यांनी मराठी–हिंदी चित्रपट सृष्टीत एक यशस्वी लेखक, दिग्दर्शक, संगीत दिग्दर्शक म्हणून नावलौकिक मिळवला आहे. कर्मयोगी आबासाहेब या चित्रपटाला आत्तापर्यंत तीस पेक्षा जास्त राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहे. तसेच तिकीट खिडकीवर सुद्धा चांगले यश मिळाले आहे. एवढेच नव्हे तर या चित्रपटाने अनेक विश्व रेकॉर्ड ही केले आहे. हा चित्रपट प्रदर्शनापूर्वीच अम्सटरडॅम लिफ्ट ऑफ आणि क्राउनवूड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात प्रदर्शित करण्यात आला होता. या चित्रपटाची गिनीज बुक आणि हाई रेंज ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, लंडन बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंद झाली आहे. तसेच बेंगलोर–इंटरनॅशनल पॅनोरामा फिल्म फेस्टिव्हल ऍवॉर्ड, थर्ड आय एशियन फिल्म फेस्टिव्हल ऍवॉर्ड, यु.के.सिडनी–लिफ्ट ऑफ फिल्म फेस्टिव्हल ऍवॉर्ड, लाहोर इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल ऍवॉर्ड, स्विडन–फायनलिस्ट फिल्म फेस्टिव्हल ऍवॉर्ड, क्राऊन वूड इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल ऍवॉर्ड, भारत नॅशनल ऍवॉर्ड, स्पेशल ज्युरी ऍवॉर्ड, आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हल ऍवॉर्ड, गोल्डन लायन फिल्म फेस्टिव्हल ऍवॉर्ड, वेस्टन युरो फिल्म फेस्टिवल (बेस्ट डायरेक्टर) इत्यादी मानाचे पुरस्कार मिळाले आहेत. आता चित्रपटसृष्टीतील सर्वात मानाचा आणि महत्त्वाचा असा दादासाहेब फाळके पुरस्कार सुद्धा कर्मयोगी आबासाहेब या चित्रपटाला जाहीर झाला असून येत्या १ मे २०२५ रोजी दिल्ली येथे भव्य कार्यक्रमात आणि मान्यवरांच्या उपस्थित पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. यामुळे चित्रपटाचे लेखक–दिग्दर्शक अल्ताफ दादासाहेब शेख यांचे विशेष कौतुक व अभिनंदन होत आहे.

# वार्षिक स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून राष्ट्रीय दर्जाचे कलाकार निर्माण व्हावेत –ॲड.तांदळे

## मातोश्री विद्यालय जि.प.शाळा व अंगणवाडी चे स्नेहसंमेलन

बीड। प्रतिनिधी


तालुक्यातील आदर्शगाव वंजारवाडी येथिल छत्रपती शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मातोश्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जि.प.प्रा.शाळा व अंगणवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मा.श्री. सर्जेराव तात्या तांदळे म्हणाले की सांस्कृतिक कार्यक्रमातुन विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो. ग्रामिण भागातील मुलांना संधी मिळते. वंजारवाडीचे विद्यार्थी हे जागतिक दर्जाचे बनले पाहिजेत.




यावेळी सर्वप्रथम सरस्वती मातेचे पुजन करुण कार्यक्रम सुरु करण्यात आला. कार्यक्रमाला विशेष उपस्थिती मा.श्री.वैजिनाथ नाना तांदळे, मा.श्री. मुरलीधर बप्पा ढाकणे यांची होती. त्यांणी सर्वांना मार्गदर्शन केले. सोमिनाथ सर, भास्कर दादा, सचिन तांदळे सर, दयावान सर यांणी मनोगते व्यक्त केली. यावेळी मान्यवरांना शाळेची जुनी परिस्थिती व आताची भव्यदिव्यता यावर भाष्य केले. एकेकाळी जि.प. शाळा मोडकळीस आली होती. शाळेचा पट हा पाच विद्यार्थ्यांवर आला होता. त्यावर तात्या नाना यांणी परिश्रम घेवुन हा पट खुप मोठ्या प्रमाणात वाढवुन शाळेला भव्य दिव्य स्वरुप प्राप्त करुण दिले. गावात पुढील शिक्षणाची सोय नव्हती म्हणुन मा. सर्जेराव तात्या याणी मातोश्री विद्यालयाचा स्थापना करुण मुलांच्या शिक्षणाची सोय केली. शिक्षणाच्या प्रवाहात आल्याने माणसाला आयुष्य जगण्याचे सुकर होते. सध्याच्या या आधुनिक काळात आपल्याला आपल्या परिसरातील विद्यार्थ्यांसोबत नव्हे तर परदेशातील मुलांसोबत स्पर्धा करायची आहे त्यामुळे सर्वांनी अभ्यासाकडे लक्ष देणे गरजेचे शाळेत शिक्षक वृंद जेवढे विद्यार्थ्यांकडे लक्ष देतात त्याचप्रमाणे पालक वर्गानेही आपल्या मुलाकडे वैयक्तिक लक्ष देणे गरजेचे आहे.सध्याचे युग हे आधुनिकतेने आणि तंत्रज्ञानाने विकसित होत चालले आहे त्यामुळे आपल्याला जगासोबत चालण्यासाठी शिक्षण घेणे गरजेचे आहे. तात्या आणि नाना यांच्या परिश्रमामुळे वंजारवाडी गाव हे शिक्षणाच्या प्रवाहात आले.एकंदरितच कार्यक्रम अतिशय सुंदर झाला.विद्यार्थ्यांचे ग्रामस्थांणी टाळ्या वाजवुन कौतुक केले. देशभक्तीमय वातावरण गावात निर्माण झाले. मातोश्री विद्यालयाचा पुर्ण स्टाफ, भारती मॅडम, नागरगोजे मॅडम, अंगणवाडी ताई यांचेही ग्रामस्थाने या यशस्वी कार्यक्रमासाठी आभार मानले. यावेळी गावातील ग्रामस्थांनी आलेल्या पाहुण्यांना व पालक वर्ग या सर्वांना चहा पाण्याची सोय केली होती.यावेळी श्री लक्ष्मण पवारसाहेब, सोमिनाथ तांदळे सर, समाजसेवक राख नाना,सचिन तांदळे सर, लक्ष्मण तांदळे सर, दयावान सर, शहादेव नाना, महादेव दादा, यादव भाऊ, दिनकर पाटील, शिवाजी नागरगोजे, अंकुश आण्णा, भास्कर दादा,बाबासाहेब दादा, अशोक धुरंधरे, आप्पा पवळ, सुनिल पवळ, दासु सातपुते, अमर सानप, विशाल खाडे, ओमकार उबाळे, सचिन तिप्पटे, पटाईत आण्णा, ओमकार कांबळे, विठ्ठल आप्पा, सोपान तात्या, अंगद महाराज, यासह संपुर्ण गावकरी, महिला भगिणी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# बीडमध्ये मांग गारुडी समाजाच्या सभागृहाचे काम प्रगतीपथावर

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली पाहणी



बीड। प्रतिनिधी

शहरातील प्रकाश आंबेडकर नगर येथे सुरू असलेल्या मांग गारुडी समाजासाठीच्या सभागृह बांधकामाची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि.२२) पाहणी केली. त्यांनी विधानसभा निवडणुकीदरम्यान समाजबांधवांसाठी सभागृह उभारण्याचे आश्वासन दिले होते, त्या आश्वासनाची पूर्तता केली आहे.

सदरील काम सध्या प्रगतिपथावर असून लवकरच ते पूर्ण होणार आहे. कामाचा दर्जा पाहता समाजातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, डॉ.योगेश क्षीरसागर यांचे आभार मानले. याप्रसंगी गोरख काळे, कल्याण अंकुशे, गणेश रोकडे, करण काळे, दिनेश चौगुले, बंडू कुसळकर, रवी काळे, लखन काळे, रवी रोकडे, संदीप काळे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, डॉ.योगेश क्षीरसागर यांनी उपस्थित नागरिकांशी संवाद साधत भविष्यातही समाजाच्या विकासासाठी अशाच प्रकारे कार्यरत राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

# तरुणींना कोणी त्रास देत असेल तर त्याची गाठ महाराष्ट्र पोलिसांशी- डॉ.नीलम गोऱ्हे

## उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी साक्षी कांबळे आत्महत्या प्रकरणी पीडित कुटुंबियांची घेतली भेट



**बीड । प्रतिनिधी**

**धाराशिव येथे मामाच्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केलेल्या साक्षी कांबळे प्रकरणात विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज बीडमध्ये पीडित कुटुंबीयांची भेट घेतली. या भेटीदरम्यान डॉ. गोऱ्हे यांनी कुटुंबीयांच्या मागण्या ऐकून घेत त्यांना मानसिक आधार दिला, तसेच दोषींवर कठोर कारवाई करण्याचा विश्वास दिला.**

या प्रकरणातील आरोपीस जामीन मिळाल्याने कुटुंबात संतापाची लाट उसळली आहे. धाराशिव पोलीस न्यायालयात आरोपीचा जामीन रद्द करण्यासाठी अपील दाखल करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, ''एफआयआर आधीच नोंदवण्यात आला असून, आता पूरक जबाब घेतला जाणार आहे. याप्रकरणात दोषींना पाठीशी घालणाऱ्यांवरही कारवाई केली जाईल.'' महाविद्यालयीन आणि शालेय विद्यार्थिनींना त्रास देणाऱ्यांबाबत त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, ''अशा त्रासदायक प्रकारांची गाठ थेट महाराष्ट्र पोलिसांशी आहे. कोणी त्रास देत असेल, छेडछाड करत असेल तर मुलींनी तात्काळ पोलिसांकडे किंवा विश्वासू कार्यकर्त्यांकडे तक्रार करावी.'' कुटुंबीयांनी मांडलेल्या मागण्यांमध्ये संबंधित पोलीस अधिकाऱ्यांचे वर्तन, जातीय भेदभावाचे आरोप आणि कारवाईत दिरंगाईचे मुद्दे उपस्थित करण्यात आले. डॉ. गोऱ्हे यांनी हे सर्व मुद्दे राज्याच्या वरिष्ठ नेतृत्वापर्यंत पोहोचवले असल्याचे सांगत, ''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही मी ही माहिती कळवली आहे. संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष या प्रकरणाकडे लागले आहे.'' डॉ. गोऱ्हे यांनी यावेळी सांगितले की, ''साक्षीचा विवाह ठरलेला होता, ती आनंदात होती. तरीही कॉलेजमधील त्रासामुळे तिचा जीव गेला. अशा 'टारगट मुलां'वर कठोर कारवाई व्हावी यासाठी मी स्वतः पोलिसांशी चर्चा केली आहे. कोणी आरोपीला संरक्षण देत असेल तर त्यांच्या विरोधातही कारवाई करण्यात येईल.'' शेवटी, त्यांनी राज्यातील सर्व मुलींना आवाहन करत सांगितले की, ''कोणी तुम्हाला त्रास देत असेल, तुमचे फोटो, व्हिडिओ चुकीच्या पद्धतीने वापरत असेल, तर भयभीत न होता पोलिसांशी संपर्क साधा. सायबर गुन्ह्यांची सुद्धा तक्रार करा. संपूर्ण यंत्रणा तुमच्या पाठिशी आहे.'' या भेटीदरम्यान बीडचे जिल्हाधिकारी श्री. अविनाश पाठक, पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावत, शिवसेना मराठवाडा सचिव श्री. अशोक पटवर्धन, महाराष्ट्र राज्य महिला आयोग सदस्य, शिवसेना संपर्कप्रमुख

पान २ वर

## साहित्य ज्योती पुरस्कार जाहीर



**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

**कथा कविता आणि कांदबरी या साहित्यकृतींना दिला जाणारा राज्यस्तरीय साहित्यज्योती २०२२-२३-२४ या तीन वर्षाचे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातूनच नव्हे तर गोवा कर्नाटक ,गुजरात या राज्यातूनही उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. विषेश म्हणजे विदेशातूनही प्रतिसाद मिळाला आहे.**

आजवर या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लोक कवी मा. विठ्ठल वाघ, प्रसिद्ध वात्रटिकाकार मा. रामदास फुटाणे, प्रसिद्ध कवी मा.अरुण म्हात्रे, प्रसिध्द विडंबनकार, मा. प्रभाकर साळेगावकर, इ. लाभले आहेत. २०२२चे पुरस्कार निवडलेली यादी तळमळीचे तळ, अजिम नवाज राही सिंदखेड, कपडे वाळत घालणारी बाई, हर्षदा सुंठणकर, बेळगाव, कोंब डखुळ, विजयकुमार मिठे नाशिक, पडरे पाण्या, प्रकाश भुते, गेवराई, गोंडर अशोक कुबडे नांदेड, २०२३ चे पुरस्कारकर्ते निवड केलेली यादी. माही गोधडी छप्पन भोकी, ललित अधाने,वैजापूर,काहूर, माया मुळे,पुणे, तांड्याचे पाय, अनिता जाधव, नांदेड. उसवण, ल.की दिवटे,बीड. निवडुंगाचे काटे जी.जी कांबळे लातूर, २०२४ पुरस्कारकर्ते निवड यादी मृगपक्षी, बाबासाहेब सौदागर, श्रीरामपूर, पान

पान २ वर

## पाटोदा एसटी महामंडळाची पार्सल सेवा बंद

पाटोदा । प्रतिनिधी


सरकारच्या खाजगीकरणाचा फटका आता शेतकऱ्यांना थेट बसू लागला आहे एसटी पार्सल व्यवस्थेचे खाजगीकरण झाले आहे. पाठवल्याची पार्सल व्यवस्था बंद आहे महासांगवी परिसरातील फुल शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना खाजगीकरणाचा पहिला फटका बसला आहे मागील दीड महिन्यापासून पार्सल व्यवस्था बंद असल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे सरकार शेतकऱ्यांना शेतीमध्ये वेगळे प्रयोग करण्यासाठी मला चांदीत आहे कृषी विभागाच्या माध्यमातून फ्रॉक छान देताना काही शेतकरी स्वखर्चाने नवनवीन प्रयोग करत आहेत पारंपारिक शेतीला पर्याय म्हणून पोलीस शेती शेळी पालन कुक्कुटपालनाची नवीन प्रयोग केले जात आहेत तालुक्यातील महासंघवाडी पारनेरवाडी नबरवाडी दासखेड आणि भागातील शेतकरी फुल शेतकरी वळले आहे. काही गावात गट निर्माण झाले असून शेतीच्या माध्यमातून निघणारी फुलकल कल्याण नगरला पाठवले जातात गोडवाडी येथील शेतकरी सुरेश भागुजी नागरगोजे यांची गेल्या

पान २ वर

## चिमुकल्या सोमेश्वरपुत्रांनी उभारले वीस पाणवठे

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**शिक्षणप्रेमींचे तिर्थक्षेत्र अमृतमहोत्सवी सोमेश्वर शैक्षणिक संकुलातील चिमुकल्या सोमेश्वरपुत्रांनी चिमण्यांसाठी वीस पानवठे झाडांना बांधले आहेत.**



माणुसप्राणी संकुचित होत असल्याने सृष्टीतील पाणी, निसर्ग, अन्न व प्राणवायुसह सर्व गोष्टीवर फक्त माझा आणि माझाच हक्क आहे, हे ग्रहित धरुन आपण चालतो. वस्तुत: या जीवनावश्यक घटकांवर आपल्याइतकाच पक्षी, प्राणी व जीवजंतुंचा समान अधिकार असतो. याच मालिकेत ''चिऊताई व काऊची'' सोमेश्वरपुत्रांनी केलेली पाणवठ्याची सोय दखलपात्र ठरत आहे. सोमेश्वर शैक्षणिक संकुलाच्या संपुर्ण मैदानावर दिडशेपेक्षा अधिक झाडे असुन चिंच, कडुनिंब, वड, पिंपळ, नांदुरकी व जांभळ या वृक्षांची संख्या पन्नासेक आहे. चिमुकले सोमेश्वरपुत्र योगेश अप्पासाहेब ठोंबरे, प्रसाद दिपक कस्तुरे व विश्वजित पद्माकर गंभीरे यांनी बालमित्रांना सोबत घेवुन प्रत्येक झाडावर चिऊकाऊसाठी टाकाऊ वस्तुपासुन सुंदर व कल्पक वीस पाणवठे उभे केले आहेत. कडक उन्हाळ्यात तहानलेल्या चिऊताईची सोय झाली याचा सर्वानंद सोमेश्वरसारथ्यांना आहे. मध्यभागी पाणी आणि बाजुला टाकलेले धान्य व्यवस्थित खाता येईल अशी त्या पाणवठ्याची रचना केली आहे. उन्हाळ्याची काहिली जिवघेणी असल्याने माणुस

पान २ वर

## वडवणीचे गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरेंना पद्मपाणी राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

### शिक्षणासाठी झिजणाऱ्या सर्वांना पुरस्कार समर्पित



**वडवणी । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याच्या शिक्षण क्षेत्रात वडवणी तालुक्याची उत्तुंग भरारी घेणारे वडवणी तालुक्याचे कर्तव्यदक्ष तथा कार्यतत्पर गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांना प्रतिष्ठेचा पद्मपाणी राज्यस्तरीय पुरस्कार २०२५ (उत्कृष्ट प्रशासक) हा नुकताच जाहीर झाला असून या पुरस्काराबध्दल त्यांच्यावर शिक्षण क्षेत्रासह सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे. दि.४ मे २०२५ रोजी बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह याठिकाणी या पुरस्काराचे मान्यवरांच्या हस्ते वितरण होणार आहे.

बीड शहरातील पद्मपाणी प्रतिष्ठान यांच्यावतीने विविध क्षेत्रातील मान्यवरांचा राज्यस्तरीय

पान २ वर

## भीमजयंतीसाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा-अशोक शेलार

**पाटोदा । प्रतिनिधी**

**पाटोदा तालुक्यातील आदर्श गाव कुसळंब येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त विविध उपक्रमाची रेलचेल पाहायला मिळणार आहे. यामध्ये महाराष्ट्रातील लोकप्रिय शाहीर शितलताई साठे यांचा शाहिरी जलसा पाहायला मिळणार आहे. तसेच मोफत आरोग्य तपासणी, भव्य रक्तदान शिबिर त्याचबरोबर बाबासाहेबांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक निघणार आहे अशा विविध उपक्रमाची रेलचेल कुसळंबमध्ये भीम जयंती निमित्त पाहायला मिळणार आहे.**



२६ एप्रिल रोजी महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती कुसळंब येथे विविध सामाजिक उपक्रमातून साजरी होणार असून यासाठी महाराष्ट्रातील प्रसिद्ध शाहीर शितलताई साठे यांच्या शाहिरी जलसा पाहायला मिळणार आहे. तसेच मोफत आरोग्य तपासणी, भव्य रक्तदान शिबिर तसेच बाबासाहेबांच्या प्रतिमेची भव्य दिव्य मिरवणूक गावातून निघणार असल्याची माहिती आयोजित कमिटी कडून देण्यात आली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र कुसळंब येथे मोफत आरोग्य तपासणी : अतुल शेलार, बाळासाहेब गायकवाड महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त २६ एप्रिल रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र कुसळंब येथे मोफत आरोग्य तपासणी घेण्यात येणार आहे, या शिबिराचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आव्हान आयोजित कमिटीकडून अतुल शेलार व बाळासाहेब गायकवाड यांनी केले आहे. प्रथमच भव्य दिव्य कार्यक्रमाची रेलचेल! कुसळंब येथे

पान २ वर

## भाजप जनता पार्टी हा सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा पक्ष-आ.लोणीकर

जालना । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी हा सर्व सामान्य जनतेचा पक्ष असून सबका विकास सबका विश्वास सबका प्रयास हे ब्रीद घेऊन काम करणारा पक्ष आहे. देशात २०१४, २०१९ आणि २०२४ साली या पक्षाला सत्तास्थापनेची संधी मिळाली. मात्र गेल्या दोन लोकसभा निवडणुकीच्या (२०१४, २०१९) तुलनेत भाजपाला २०२४ साली स्वबळावर बहुमताचा आकडा गाठता आला नाही. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपा प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीला केवळ २९३ जागांवरच समाधान मानावे लागले. यात भाजपाचा वाटा २४० इतका



आहे. २०१४ मध्ये २८२ आणि २०१९ मध्ये ३०३ जागा जिंकत स्वबळावर बहुमताचा आकडा भाजपाने पार केला होता. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत विरोधी पक्षांच्या इंडि आघाडीने भाजपासमोर फेक नरेटीव्ह च्या माध्यमातून मोठे आव्हान उभे केले होते. परिणामी भाजपाला उत्तरप्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक, पश्चिम बंगाल, राजस्थान या ठिकाणी भाजपाला थोडाफार फटका बसला. परंतु भारतीय जनता पार्टी पुन्हा एकदा सत्तेत आलो असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आज केले.

भारतीय जनता पार्टीच्या परतुर मंठा व जालना ग्रामीण या तीन मंडळाच्या तालुकाध्यक्ष पदाची निवड आज करण्यात आली. यावेळी भारतीय जनता पक्षाच्या श्री कणसे , छायाताई गोरबांड, नितीन राठोड, विक्रम उफाड यांचे नियुक्ती करण्यात आली. तसेच श्री जाधव , श्री मोरे यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी पदाधिकाऱ्यांना संबोधित करताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की भारतीय जनता पक्ष हा सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा पक्ष असून तो समाजाच्या शेवटच्या घटकातून पर्यंत पोहोचवण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत. पुढे बोलताना लोणीकर म्हणाले की, १९५१ साली श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी भारतीय जनसंघाची स्थापना केली होती. जनसंघ हे राष्ट्रीय स्वयंसेवक

पान २ वर

## विभागीय आयुक्त साधणार पाणीटंचाई व पाणीपुरवठा या विषयावर थेट संवाद

### २३ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता ऑनलाईन वेबिनारचे आयोजन

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या संकल्पनेतून ''संवाद मराठवाड्याशी'' हा उपक्रम सुरु करण्यात आला असून, त्याअंतर्गत २३ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ४ वाजता ऑनलाईन वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे. या वेबिनारमध्ये विभागीय आयुक्त दिलीप गावडे हे पाणीटंचाई व पाणीपुरवठा या विषयावर विभागातील नागरिकांशी थेट संवाद साधणार आहेत.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून विभागातील नागरिकांच्या अडचणी, समस्या, सूचना आणि अपेक्षा समजून घेण्यात येणार असून त्यानुसार संबंधित विभागांना कार्यवाहीचे निर्देश देण्यात येणार आहेत. सदर वेबिनारमध्ये निवासी उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी सहभागी होणार आहेत. संबंधित नागरिकांसाठी वेबिनारमध्ये सहभागी होण्यासाठी आवश्यक लिंक व

पान २ वर

## आरुष चव्हाण याचे डॉ.होमी भाभा परीक्षेत यश

**अंबड । प्रतिनिधी**



विज्ञान शिक्षक संघटनेच्या वतीने छत्रपती संभाजी नगर विभागीय डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षेमध्ये अंबड येथील श्रीमती चंद्रप्रभा स्वरूपचंद कासलीवाल जैन इंग्लिश स्कूलचा इयत्ता नववीचा विद्यार्थी चव्हाण आरुष श्रीनिवास याने हे यश संपादन केले असून बाल वैज्ञानिक म्हणून कांस्य पदक प्राप्त केले आहे. या यशाबद्दल आयुषचे शाळेचे अध्यक्ष डॉ. प्रवीणकुमारजी कासलीवाल यांच्यासह डॉ. रमेशचंद्रजी गंगवाल, शिरीष सावजी, प्रवीण बाकलीवाल, संजय चांदीवाल, सुरेश दिडपोळे, राजेंद्र काला, डॉ. नरेश अग्रवाल, डॉ. संतोष मोहळे, चंद्रप्रभू दिडपोळे, संजय इंचूरे, मुकेश सावजी, संतोष बाकलीवाल, दिपक पाटणी, भूषण काला, डॉ. अनिल पांडे, दिलीप बूर्ले तसेच शाळेचे मुख्याध्यापक एन. एस. भारद्वाज यांच्यासह सर्व शिक्षक व पालक यांनी अभिनंदन केले आहे.

## जीवनात यशस्वी होण्यासाठी विजेत्यांसारखी मानसिकता हवी-डॉ.राजेश इंगोले

### *प्रकाश मुथा स्मृतीप्रित्यर्थ आयोजित क्रिकेट स्पर्धेचे बक्षीस वितरण*

अंबाजोगाई । प्रतिनिधी

विजेत्याची मानसिकता विकसित करणे ही एक प्रक्रिया आहे, जी अवघड नाही. पण, नियमित प्रयत्नांनी आणि सकारात्मक विचारांनी ती नक्कीच साध्य करता येते. आपण जर या मानसिकतेवर काम केले, तर आपण आपल्या जीवनात कोणत्याही क्षेत्रात यश मिळवू शकतो असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा व्याख्याते डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केले.

स्व.प्रकाश सुरजमल मूथा यांच्या स्मरणार्थ आयोजित शुमा कप - २०२५ लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळ्यात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी विचारमंचावर स्वारातीचे विभागप्रमुख डॉ.सिद्धेश्वर बिराजदार, डॉ.राजेश इंगोले, सौ.सुरेखा सिरसाट, सौ.देशमुख, श्रीमती प्रेमा मुथा, सौ. विजया मुथा, प्रा.भूषण गवली, सौ. उज्वला मुथा, सौ.संगीता मुथा, निलेश मुथा, समीर लाटा, प्रतीक बोथरा, हर्ष मुथा यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी विजेत्याची मानसिकता ही मनाची एक सकारात्मक अवस्था आहे जी आत्मविश्वास, प्रेरणा, दृढनिश्चय, लवचिकता आणि मानसिक कणखरता या सारख्या गुणांनी वैशिष्ट्यीकृत आहे. त्यामुळे खेळाडूंनी आपल्या खेळाच्या कौशल्यासोबतच विजेता मानसिकता आपल्या अंगी विकसित करण्यावर भर द्यावा असे मार्गदर्शन खेळाडूंना केले. संघर्षाशिवाय यश नाही आणि परिश्रमाला पर्याय नाही असे सांगत विजेते एका रात्रीत घडत नाहीत तर त्यासाठी त्यांनी वर्षानुवर्षे केलेली तपस्या त्यांना विजेते घडविते असे डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले. अंबाजोगाई मध्ये क्रिकेट खेळ हे एक करीयर असू शकते हा विचार रूजवणारे अंबाजोगाई क्रिकेट अकादमी आणि शुमा क्रिकेट अकादमीचे मोहित परमार



आणि माही परमार हे ग्रामीण भागातील खेळाडूंना राज्यस्तरीय, राष्ट्रस्तरीय संधी प्राप्त करून देत असल्याबद्दल डॉ.राजेश इंगोले यांनी त्यांचे कौतुक केले. यावेळी बोलतांना डॉ सिद्धेश्वर बिराजदार यांनी कोणताही खेळ खेळत असतांना खिलाडू वृत्ती आणि प्रामाणिकपणा हा त्या खेळाचा आत्मा असतो. त्यामुळे खेळाडूंनी प्रामाणिकपणा, परिश्रम आणि खिलाडूवृत्ती जोपासली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली. हार-जीत हा खेळाचा भाग असतो तो स्वीकारून नव्या ताकतीने पुढे जाता आले पाहिजे असे

पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# युगेंद्रची तुलना अजितदादा किंवा माझ्याशी नको !



## सत्ता नसताना तो काम करतोय; शरद पवारांचा सल्ला

**बारामती । प्रतिनिधी**

**गेल्या काही दिवसांपासून युगेंद्रने कामाला सुरुवात केली आहे, पण त्याची तुलना माझ्याशी किंवा अजितदादांशी करू नका असं शरद पवार म्हणाले. आम्ही राजकारणाची सुरुवात केली त्यावेळी आमच्याकडे सत्ता होती. युगेंद्र सत्ता नसताना काम करतोय असं शरद पवारांनी सांगितलं. शरद पवारांच्या उपस्थितीत युगेंद्र पवारांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. त्यावेळी शरद पवार बोलत होते.**

युगेंद्रचा स्वभाव हा नम्र आहे, त्याला सुसंवाद ठेवायचा आहे. तो आपल्या परीने जे काही शक्य आहे ते करण्याचा प्रयत्न करतोय असं शरद पवार म्हणाले. त्यावेळी त्याची तुलना ही माझ्याशी किंवा अजित पवारांशी करू नका असं ते म्हणाले. शरद पवार म्हणाले की, ‘‘आम्ही ज्यावेळी राजकारणात आलो त्यावेळी आमच्या हातात सरकार होतं. युगेंद्र हा सत्ता नसताना काम करतोय. त्यामुळे त्याच्या हातात कष्ट करणे हे आहे. लोकांशी जेवढा संपर्क ठेवता येईल तेवढा ठेवायचा हे त्याच्या हातात आहे. त्यासाठी तुम्हच्या सर्वांची साथ त्याला हवी आहे. त्यामुळे या क्षणी सत्तेची अपेक्षा आपण ठेवता कामा नये.‘‘ राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते युगेंद्र पवार यांचा आज वाढदिवस. त्यानिमित्ताने ते आणि त्यांचे कार्यकर्ते शरद पवारांच्या भेटीला गेले होते. शरद पवारांच्या उपस्थितीत युगेंद्र पवारांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. त्यावेळी शरद पवारांनी युगेंद्र पवार यांना खास शुभेच्छा दिल्या. आता एकट्याचे अभिनंदन किती दिवस करायचे? आम्हाला अक्षता टाकायच्या आहेत, लांबवू नका असं शरद पवार म्हणतात उपस्थितांमध्ये एकच हास्य फुललं. युगेंद्र पवारांचा वाढदिवस साजरा करताना शरद पवारांनी त्यांच्या वाढदिवसाची आठवण सांगितली. ते म्हणाले की, आज जमाना बदलला आहे. गावागावात केक आले आहेत. आमचा वाढदिवस हा गुळ खोबरं किंवा गुळ शेंगदाणे वाटून साजरा केला जायचा.

## कार चालकाला लुटून पळालेल्या चोरट्याला पाठलाग करून पकडले; पोलीस आयुक्तांच्या हस्ते कर्मचाऱ्यांचा सत्कार

**पिंपरी । प्रतिनिधी**

**वाकड येथे कार चालकाला कोयत्याचा धाक दाखवून जबरदस्तीने पैसे घेऊन पाळलेल्या चोरट्याला वाकड पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी इम्रान सय्यद आणि विक्रम भगत यांनी पाठलाग करून पकडले. ही घटना मंगळवारी (२२ एप्रिल) पहाटे पावणे चार वाजताच्या सुमारास घडली.**



अरबाज उर्फ लाला इरफान शेख (२३, कोंढवा बुद्रुक, पुणे) याला पाठलाग करून पकडले असून त्याचा साथीदार राजू उर्फ सत्यम वीरबहादूर सिंग (२४, घोरपडी पेठ, पुणे) याचा शोध घेऊन अवघ्या काही तासात अटक करण्यात आली. पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी पहाटे सुरेश महादेव जाधव (३४, काळेवाडी) हे वाकड पोलीस ठाण्यात आले. ते ग्लोबल पंजाब हॉटेल वाकड येथे पॅसेंजर घेण्यासाठी थांबले असताना दुचाकीवरून आलेल्या दोघांनी त्यांना कोयत्याचा धाक दाखवून त्यांच्याकडून ३१०० रुपये जबरदस्तीने चोरून नेले असल्याचे सांगितले. त्यानुसार पोलीस कर्मचारी इम्रान सय्यद आणि विक्रम भगत यांनी जाधव यांच्या कार मधून आरोपींचा शोध सुरु केला. दत्त मंदिर रोड वर आरोपी दिसले. पोलीस आल्याची चाहूल लागताच आरोपी पळून जाऊ लागले. काळा खडक येथे आल्यानंतर आरोपींच्या दुचाकीला कार आडवी लावून त्यांना थांबवले. त्यानंतर देखील आरोपी पळून जात असताना इम्रान सय्यद यांनी पाठलाग करून अरबाज शेख याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून दुचाकी आणि कोयता जप्त केला. त्याचा साथीदार अंधाराचा फायदा घेऊन पळून गेला. मात्र अवघ्या काही तासात त्याला देखील वाकड पोलिसांनी बेड्या ठोकल्या. या कामगिरीबद्दल पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी पोलीस कर्मचारी इम्रान सय्यद आणि विक्रम भगत यांचा सत्कार केला. यावेळी पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे, पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड, सहायक आयुक्त सुनील कुराडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक नीता गायकवाड उपस्थित होते.

## वरिष्ठ पोलीस निरीक्षकासह तिघांची तडकाफडकी बदली; अधिकार्यांच्या बदलीने पुणे पोलीस दलात खळबळ

**पुणे । प्रतिनिधी**

**शहरातील बाणेर आणि शिवाजीनगर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या दोन्ही वरिष्ठ पोलीस निरीक्षकांची बदली करण्यात आली आहे. एका वरिष्ठाला शिक्षा तर दुसर्याला चांगल्या कामगिरीचे गिफ्ट देण्यात आले आहे. तसेच, एका सहायक पोलीस निरीक्षक महिलेसह पोलीस उपनिरीक्षक महिलेची बाणेर पोलीस ठाण्यातून गोपनियतेचा भंग केला म्हणून बदली करण्यात आली आहे.**





पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या कारवाईने पोलीस खात्यात खळबळ उडाली आहे. बाणेर पोलीस ठाण्यात कार्यालयाच्या नूतनीकरणावेळी पोलीस अंमलदार वरिष्ठ पोलीस निरीक्षकाच्या खुर्चीत बसल्याचा फोटो व्हायरल झाला होता. त्यानंतर एकाच ठाण्यातील तिघांवर बदलीची कारवाई झाली. बाणेर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नवनाथ जगताप यांची मुदतपूर्व बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रशेखर सावंत यांची नियुक्ती केली. मागील दीड वर्षांपासून सावंत यांनी शिवाजीनगर पोलीस हद्दीत चांगली कामगिरी बजावली होती. त्यापार्श्वभूमीवर त्यांची बाणेर पोलीस ठाण्यात नियुक्ती केली आहे. तसेच, वाहतूक विभागात कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक महेश बोळकोटगी शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली.

## आळंदी: मुख्य रायझिंग लाईनला गळती दीड दिवस पाणीपुरवठा राहणार बंद

**आळंदी । प्रतिनिधी**

**आळंदी नगरपरिषद हद्दीतील साखरे महाराज पुलाजवळील मुख्य रायझिंग लाईनला गळती लागल्याने तातडीने दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येणार आहे. यामुळे गुरुवार, २३ एप्रिलपासून अंदाजे दीड दिवस संपूर्ण आळंदी शहराचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. आळंदी नगरपरिषदेने याबाबत जाहीर आवाहन जारी करून सर्व नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.**



नगरपरिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, पाणीपुरवठा दुरुस्तीनंतर रोटेशन पद्धतीने सुरळीत केला जाईल. तथापि, तांत्रिक कारणांमुळे दुरुस्तीचे काम लांबल्यास पाणीपुरवठा सुरू होण्यास विलंब होऊ शकतो. याची नागरिकांनी नोंद घ्यावी आणि पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन नगरपरिषदेने केले आहे. या कालावधीत नागरिकांनी पाण्याचा साठा करून ठेवावा आणि आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असेही सुचवण्यात आले आहे.

## डॉ.घैसास यांच्यावर कारवाई झाल्यास आंदोलनाचा इशारा

**पुणे । प्रतिनिधी**

**डॉ. सुश्रुत घैसास यांच्यावर पोलिसांनी अटकेची कारवाई केल्यास आंदोलन करण्याचा इशारा इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) व आयएमए च्या हॉस्पिटल बोर्ड ऑफ इंडिया यांनी दिला आहे.**

ईश्वरी भिसे मृत्यू प्रकरणी डॉ. घैसास यांच्यावर अलंकार पोलिस ठाण्यात वैद्यकीय निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल झाला आहे. मात्र, हा गुन्हा दबावाखाली दाखल झाल्याचे हॉस्पिटल बोर्ड ऑफ इंडिया चे अध्यक्ष डॉ. संजय पाटील यांनी सांगितले. ते म्हणाले की, ससून रुग्णालयाच्या समितीने त्यांना आधी एक दिवस काही चूक नसल्याचा अहवाल दिला. नंतर लगेच दुसऱ्या दिवशी त्यांच्यावर वैद्यकीय निष्काळजीपणाचा आरोप केला गेला. रुग्णाची आपत्कालीन स्थिती नव्हती, ही उच्च-जोखीम गरोदरपणाची रुग्ण होती. त्यामुळे निष्काळजीपणाचे कलम लागू होत नाही. याबाबत ‘आयएमए’ सोबत लवकरच २-३ दिवसांत संयुक्त बैठक होणार आहे. पुणे ‘आयएमए’चे अध्यक्ष डॉ. सुनील इंगळे म्हणले की, ही रुग्ण भरती केलेली नव्हती तर बाह्यरुग्ण विभागात होती. त्यामुळे निष्काळजीपणाचे कलम लागूच होत नाही. डॉ. घैसास यांनी जुळ्या बाळांच्या नवजात अतिदक्षता विभागातील उपचारांसाठी १० लाख रुपये मागितले होते. ते त्यांनी रुग्णालय प्रशासनासाठी मागितले होते. त्यांना आयएमए कायदेशीर लढाईत पूर्णपणे मदत करणार आहे.



## भोडणी येथे संगीत विठ्ठल कथा व ज्ञानेश्वरी पारायणास प्रारंभ



**इंदापूर । प्रतिनिधी**

**इंदापूर तालुक्यातील मौजे भोडणी येथील चव्हाण वस्ती येथे,सालाबाद प्रमाणे संगीत विठ्ठल कथा व ज्ञानेश्वरी पारायणाची सुरुवात इंदापूर नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष प्राध्यापक कृष्णाजी ताटे तसेच ह.भ.प.दादासाहेब चव्हाण यांच्या हस्ते हरिनामाच्या जयघोषात नुकतीच करण्यात आली.**

गोसावी बाबांच्या आशीर्वादाने भोडणी परिसरात गेल्या पंधरा वर्षापासून,संगीत विठ्ठल कथा आयोजन केले जात आहे.यंदाही या कथेला प्रारंभ झाला असून, भागवताचार्य ह.भ.प.केशव भागवत तोडकर महाराज हे कथा प्रवक्ते म्हणून काम सेवा देत आहेत. या सप्ताहात,ह.भ.प.राजेंद्र खाडे,विजयसिंह कानगुडे,भजनदास महाराज मिसाळ,हरिदास महाराज चव्हाण,विशाल महाराज वाघमारे,राम महाराज अभंग,प्रमोद महाराज शिंदे,दत्तात्रय महाराज बेलकर,दिलीप महाराज पवार,संतोष महाराज मगर,अंकुश महाराज खुरंगे,संगीत विठ्ठल कथेला परिपूर्ण साथ देत आहेत. २७ एप्रिल रोजी,सकाळी दहा ते बारा ह.भ.प.राजू महाराज करडे यांचे काल्याचे किर्तनहोणार असून नंतर महाप्रसाद होणार आहे.अशी माहिती आयोजक दादासाहेब चव्हाण यांनी दिली.

## लैंगिक अत्याचार प्रकरणातील दोषीला १० वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा

**शिरूर । प्रतिनिधी**

**शिवाजीनगर सत्र न्यायालयात आज झालेल्या सुनावणीत शिरूर येथील बबलु उर्फ अमीर शब्बीर बाले (वय ३१) या आरोपीस बाल लैंगिक अत्याचारप्रकरणी दोषी ठरवून १० वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. यासोबतच आरोपीवर १०,००० रुपयांचा दंडही लावण्यात आला असून, दंड न भरल्यास अतिरिक्त एक महिन्याची शिक्षा भोगावी लागेल, असे आदेश देण्यात आले.**

या प्रकरणी गुन्हा र.नं. २८९/२०१४ प्रमाणे भारतीय दंड विधान कलम ३७६ तसेच पोक्सो कायद्याच्या कलम ३, ४, ६ व ८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. विशेष न्यायालय (स्पे. केस नं. २९३/१४) समोर सुनावणी सुरू होती. दुसरा आरोपी शब्बीर अब्दुल बाले (वय ५२) हा न्यायप्रक्रियेपूर्वीच मृत्यूमुखी पडला होता. या खटल्याचे कामकाज ए. एस. वाघमारे (सो. जिल्हा व सत्र न्यायाधीश, पुणे) यांच्या न्यायालयात पार पडले. सरकारी पक्षाचं प्रतिनिधित्व प्रसिद्ध सरकारी वकील मारुती वाडेकर यांनी यशस्वीपणे केलं. प्रकरणाचा तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक भगवान निंबाळकर (सेवानिवृत्त) व सध्या मुंबईत कार्यरत असलेल्या पोलीस निरीक्षक श्रीमती सुवर्णा हुलवान यांनी केला होता. कोर्ट पैरवीसाठी पो.हवा. बाळासाहेब गदादे (बं.नं.३२९६) आणि महिला पोलीस कॉन्स्टेबल रेणुका भिसे (बं.नं.५१७) यांनी जबाबदारी पार पाडली. प्रभारी अधिकारी म्हणून शिरूर पोलीस ठाण्याचे निरीक्षक संदेश केंजळे कार्यरत होते. सत्र न्यायालयात कोर्ट पैरवी अंमलदार म्हणून श्रेणी पोलीस उपनिरीक्षक विद्याधर निचीत आणि जिल्हा कोर्टाचे पैरवी अधिकारी संतोष घोळवे यांचेही या प्रकरणात मोलाचे सहकार्य लाभले. समन्स व वॉरंट अंमलाची जबाबदारी पोहवा वाडेकर यांनी सांभाळली. या निर्णयामुळे पीडितेला न्याय मिळाला असून, अशा गंभीर गुन्ह्यांविरोधात न्यायालय कठोर भूमिका घेत असल्याचे पुन्हा सिद्ध झाले आहे.

## पुणे जिल्ह्यासाठी ३५ हजार परवडणारी घरे; या सुविधा असणार

**पुणे । प्रतिनिधी**

**पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरासह ग्रामीण भागात पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत ३५ हजार घरे बांधण्यात येणार आहेत. त्यासाठी जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तीन लाख रुपयांच्या आत वार्षिक उत्पन्न असणाऱ्यांसाठी ही घरे असून, परवडणाऱ्या दरात ही घरे उपलब्ध करून दिली जाणार आहे, तसेच ही घरे चांगल्या दर्जाची आणि ८० वर्षे टिकतील, अशी बांधण्यात येणार असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.**




साखर संकुल येथे एका बैठकीनंतर उपमुख्यमंत्री पवार यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्या वेळी ते बोलत होते. याप्रसंगी पवार यांनी सांगितले की, पंतप्रधान आवास योजना शहरी या उपक्रमाअंतर्गत सर्वांसाठी घरे ही संकल्पना राबविण्यात येत आहे. यंदा केंद्र सरकारने राज्य शासनाला मोठे उद्दिष्ट दिले आहे. पुणे, पिंपरी चिंचवड शहर आणि ग्रामीण भागात ३५ हजार घरे बांधण्यात येणार आहे. त्यासाठी दोन्ही शहरांत विविध ठिकाणी जागा उपलब्ध करून दिल्या जाणार आहे. बावधन येथे एक जागा निश्चित केली आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि ग्रीन मानांकने वापरून ही घरे उभारण्यात येणार आहे. सोलर यंत्रणा, लिफ्ट आदी सुविधा असणार आहेत, असेही पवार यांनी या वेळी सांगितले.

## भूमी अभिलेख विभागात आणखी एक प्रताप; गुन्ह्यात आधी क्लीनचीट; आता मलईदार पोस्टींग

**पुणे । प्रतिनिधी**

**भूमी अभिलेख विभागाचे रोज नवनवीन प्रताप गाजत असताना गेली अनेक वर्ष शासकीय संस्थेची व शासकीय जमीन एका खातेदाराला बहाल करणाऱ्या अधिकाऱ्याची करामत आता बाहेर आली आहे. खातेनिहाय विभागीय चौकशीत दोषसिद्ध होऊन कारवाई न होता या अधिकाऱ्याला क्लीन चिट दिल्यानंतर या बहादर अधिकाऱ्याने भूमी अभिलेख विभागाला तर गंडवलेच तसेच चक्क फोजदारी गुन्ह्यातून आपली मान बाहेर काढण्याची किमया केली आहे. उलट खात्याकडून मलाईदार पोस्टिंगची खैरात या अधिकाऱ्याने पदरात पाडून घेतली आहे,आता तर चक्क मोठ्या पदावर बढतीचे बक्षीस मिळवण्याच्या प्रयत्नात हा महाभाग आहे.**




भूमी अभिलेख विभागात लगतची मोजणी चुकल्याच्या कारणावरून फौजदारी गुन्हा दखल होत असताना या अधिकाऱ्याने शासकीय मिळकतीस बाधा निर्माण करून खासगी मिळकतदारास मोजणी नकाशा दिला मात्र अधिकारी सहीसलामत सुटला आणि दोन कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई झाली.नगर भूमापन अधिकाऱ्याची या प्रकरणात विभागीय चौकशी होऊन दोषसिद्धी होऊन ही नियमबाह्य मोजणी नकाशा देणाऱ्या या अधिकाऱ्यावर कारवाई होण्याऐवजी त्यास मलाईदार पोस्टिंगचे बक्षीस खात्याकडून मिळत असल्याने भूमी अभिलेख विभागात आश्चर्य व्यक्त होत आहे. पुण्यातील नगर भुमापन अधिकारी क्र. २ च्या कार्यक्षेत्रात मिळकत क्रमांक १२७९ चे मूळ क्षेत्र ४४५० चौ. मी. असताना खातेदाराला महानगर पालिकेच्या टीडीआर चा लाभ व्हावा म्हणून लगत असणाऱ्या शासकीय संस्थेच्या मिळकत क्रमांक १४९५ मधील व नदीपात्रात असलेल्या सरकारी मिळकत त्या खातेदाराच्या नावे दाखवून ७४५०.५० चौ. मी.क्षेत्राचा चा मोजणी नकाशा दाखवून त्या मिळकत दारास फायदा होईल असे नियम बाह्य ३०२९ चौ. मी. चे जादा क्षेत्राची मोजणी नकाशात दाखवून फायदा करण्याच्या उद्देशाने अनियमितता केल्याचा ठपका ठेऊन उपसंचालक भूमी अभिलेख पुणे प्रदेश यांनी महाराष्ट्र नागरी सेवा( वर्तणूक) नियम १२७९ चे नियम ३ चा भंग केल्याने २ कर्मचाऱ्यांना निलंबित केले तर नगर भुमापन अधिकारी क्र २ यांची खाते निहाय विभागीय चौकशीचा अहवाल जमाबंदी आयुक्तांकडे कारवाईसाठी पाठवला आहे.विशेष म्हणजे या प्रकरणत फोजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एवडे रामायण होऊनही भूमापन अधिकारी यांच्या शासकीय गोपनीय खातेनिहाय चौकशीच्या अहवालावर काहीच कारवाई झालेली नाही. गेली अनेक वर्ष हा अहवाल गुलदास्त्यात पडला आहे. शासकीय जमीन खासगी खातेदारास बहाल केल्याची घटना अत्यंत गंभीर असताना शासनाची या प्रकरणात उदासीनता प्रकर्षाने जाणवत आहे. या घटनेनंतर या बहादर अधिकाऱ्यास मलाईदार पोस्टिंगची खैरात शासनाकडून देण्यात आली आहे. शासकीय जमीन अधिकाऱ्यांच्या मेहरबानीने गिळंकृत करणाऱ्यांना फौजदारी गुन्ह्याने चाप बसला परंतु तसे करणाऱ्या अधिकाऱ्यावर अद्याप कारवाई का नाही हे गुलदास्त्यात आहे.